दैनिक
# राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com
नवी दिशा... नवे विचार.....
email:rajyaloktantra75@gmail.com
● पुणे ● अहिल्यानगर ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२०६ | रविवार दि.२३ नोव्हेंबर २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### कसे पेलणार भाजप आव्हान?

गेल्या दशकात भारतीय जनता पक्षाने ‘विकास’, ‘मजबूत नेतृत्व’ आणि ‘राष्ट्रीय अभिमान’ हे घोषवाक्य जोरदार पेटवले. पण आजच्या सामान्य नागरिकासाठी हा नारा फक्त घोषणापत्रातच अडकलेला दिसतोय. प्रश्न सोपा आहे. हा विकास खरंच जनतेच्या खिशात, घरात पोहोचतोय का, की फक्त चमकदार फटाक्यांच्या तेजावर राजकीय रंगमंच सजवला जात आहे?

# फक्त आकड्यांचा खेळ शेतकऱ्यांना मदत नाहीच!

**शेतकरी बांधवांच्या आत्महत्यांना राज्य सरकारच जबाबदार ; काँग्रेसचा हल्लाबोल**

मुंबई । प्रतिनिधी

**कर्जमाफी आणि शेतकरी आत्महत्यांच्या मुद्यावरुन काँग्रेसने राज्य सरकारवर निशाणा साधला आहे. कर्जमाफीचे आश्वासन देऊनही कर्जमाफी दिली नाही. शेतमालाला भाव दिला नाही, असा आरोप महाराष्ट्र काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. याबाबत त्यांनी एक्सवर पोस्ट केली आहे.**



दुष्काळ, ओला दुष्काळ, अतिवृष्टी, पिकावर आलेला रोग या सर्व नैसर्गिक चक्रव्यूहात तुम्ही शेतकऱ्याला राज्यकर्ते म्हणून वाऱ्यावर सोडले. तो चक्रव्यूहातून बाहेर पडायचा रस्ता शोधत असताना तुम्ही मदतीचे आकडे जाहीर करून त्याला आस दाखवली, पण ती मदत त्याला मिळालीच नाही. ज्यांना मिळाली त्याने फक्त त्यांच्या जखमेवर मीठ चोळले गेले, अशा शब्दांत त्यांनी सरकारवर टीकास्त्र सोडले आहे. शेतकरी बांधवांच्या आत्महत्यांना राज्य सरकारच जबाबदार असल्याचा गंभीर आरोप त्यांनी केला आहे. या पोस्टमध्ये त्यांनी मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्येची आकडेवारी निदर्शनास आणून दिली आहे. गेल्या दहा महिन्यांत मराठवाड्यातील ▶▶ पान २ वर

# ‘अतिवृष्टी’चे ९८४ कोटी बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात

बीड। प्रतिनिधी

जिल्ह्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी तसेच रब्बी पेरणीसाठी राज्य शासनाने मंजूर केलेल्या अनुदानाचे वितरण वेगाने सुरू आहे. आतापर्यंत तब्बल ९८४ कोटी ४९ लाख रुपये थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

जून ते सप्टेंबर २०२५ या काळात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टी आणि महापुराने खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले. दीड हजारांवर विहिरी बुजल्या, तर हजारो हेक्टर जमीन मातीसह खरडून गेली. शासनाने जिल्ह्यास १४१० कोटी १२ लाखांचे दोन टप्प्यांतील अनुदान मंजूर केले आहे. त्यापैकी पीक नुकसान अनुदानासाठी ७०२ कोटी ४ लाख तर रब्बी पेरणी अनुदानासाठी ७०८ कोटी ८ लाख रुपये अशी तरतूद केली आहे. जिल्ह्यातील १४,८०,६३९ शेतकऱ्यांची ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### तिरुपती देवस्थानात लाडूंसाठी भेसळयुक्त तूप

तिरूपती : तिरुपती मंदिरात भेसळयुक्त तूप वापरून अंदाजे २० कोटी लाडू तयार करण्यात आले होते. २०१९–२०२४ दरम्यान वाटण्यात आलेल्या एकूण ४८.७६ कोटी लाडूंपैकी हे लाडू होते, अशी माहिती श्री वेंकटेश्वर मंदिराचे व्यवस्थापन करणाऱ्या तिरुमला तिरुपती देवस्थानम (टीटीडी) ट्रस्ट बोर्डाचे अध्यक्ष बीआर नायडू यांनी दिली आहे. ही आकडेवारी २०१९ ते २०२४ दरम्यान वाटण्यात आलेल्या प्रसादाच्या एकूण ४८७.६ दशलक्ष लाडूंपैकी २० कोटी लाडू हे भेसळयुक्त तुपाचा वापर करुन बनवले होते, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. मंदिरात दररोज येणाऱ्या भाविकांची संख्या, खरेदीची माहिती आणि उत्पादन आणि विक्रीचे आकडे यांचा विचार करून साध्या गणनेच्या आधारे हे आकडे काढण्यात आले आहेत. एसआयटीने अलीकडेच या प्रकरणासंदर्भात टीटीडीचे माजी अध्यक्ष आणि वायएसआरसीपी खासदार वायव्ही सुब्बा रेड्डी यांची आठ तास चौकशी केली.

### ड्रोनद्वारे पाकिस्तानातून शस्त्रास्त्र तस्करी

दिल्लीः दिल्ली पोलिसांनी पाकिस्तानचा आणखी एक मोठा कट उधळून लावला आहे. गुन्हे शाखेने पाकिस्तानच्या आयएसआयशी संबंधित एका मोठ्या आंतरराष्ट्रीय शस्त्र तस्करी टोळीचा पर्दाफाश केला असून, पाकिस्तानातून भारतात पाठवण्यात आलेला अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचा मोठा साठा जप्त केला आहे. पाकिस्तानमधून अत्याधुनिक शस्त्रे ड्रोनद्वारे पंजाबमध्ये पाठवण्यात आली होती. कुख्यात गुंडांना शस्त्रे पुरवणाऱ्या चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. पाकिस्तानातून दिल्ली मध्ये पाठवण्यात आलेल्या शस्त्रास्त्रांचा हा साठा लॉरेन्स बिश्नोई, बंबीहा, गोगी हिमांशू भाऊ टोळीला पुरवण्यात येणार होता. असेही पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे.

### ८ व्या वेतन आयोगाच्या अटी बदलण्याची मागणी

दिल्लीः केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या ८ व्या वेतन आयोगाच्या कार्यकक्षेतील अनेक अटी आणि शर्ती बदलण्याची मागणी नॅशनल कौन्सिल (स्टाफ साईड) ऑफ द जॉईंट कन्सल्टेटिव्ह मशिनरी या संघटनेने केली आहे. या संदर्भात त्यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना पत्र लिहिले आहे. जुनी पेन्शन योजना पूर्ववत करणे, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शनमध्ये सुधारणा करणे आणि मागील वेतन आयोगांतील काही महत्त्वाचे खंड पुन्हा समाविष्ट करणे, या प्रमुख मागण्यांचा यामध्ये समावेश आहे.

### खर्चाची चिंता तुम्ही करू नका– चंद्रशेखर बावनकुळे

गडचिरोलीः भाजपच्या प्रचार सभेसाठी आलेल्या महिला उन्हात बसल्याचे दिसताच राज्याचे मंत्री आणि भाजपचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी भाजपचे गडचिरोली जिल्हाध्यक्ष रमेश बारसागडे यांचे कान टोचले. कमी बजेट असल्याचे सांगत आपल्या लाडक्या बहिणींना उन्हात बसवू नका, मी स्टार प्रचारक आहे, तुम्ही खर्चाची चिंता करू नका असे बावनकुळे म्हणाले. मी राज्यावर आहे, निवडणूक आयोगाला आम्ही हिशोब देऊ असेही ते म्हणाले. गडचिरोलीत भाजपच्या प्रचार कार्यालयाचे उद्घाटन आणि प्रचार सभा पार पडली. यावेळी काहीजण उन्हामध्ये बसल्याचं दिसून आलं. तेव्हा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हाध्यक्षांचे कान टोचत मंडप पूर्ण नाही टाकला, याबाबत विचारणा केली.

### दहशतवादाविरुद्ध लढा–पंतप्रधान मोदी

दिल्लीःअंमली पदार्थ (ड्रग्ज) तस्करी, विशेषतः फेंटानिल सारख्या धोकादायक पदार्थांच्या प्रसाराचा सामना करण्यासाठी भारताने अंमली पदार्थ–दहशतवाद संबंधाचा सामना करण्यासाठी २० इनिशिएटिव्हचा प्रस्ताव मांडला आहे. या धोकादायक अंमली पदार्थ–दहशतवाद संबंध कमकुवत करण्यासाठी आपण एकत्र काम करूया, असे आवाहन जी–२० शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. पंतप्रधान मोदींनी जी–२० शिखर परिषदेबाबत सोशल मीडियावर अनेक पोस्ट केल्या आहेत. त्यांनी लिहिले आहे की, ‘‘मी दक्षिण आफ्रिकेतील जोहान्सबर्ग येथे झालेल्या २० शिखर परिषदेच्या पहिल्या सत्रात भाग घेतला. हे सत्र सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासावर केंद्रित होते. आफ्रिका प्रथमच २० शिखर परिषदेचे आयोजन करत आहे. आता आपल्या विकासाच्या प्रतिमानांवर पुनर्विचार करण्याची आणि सर्वांना सोबत घेऊन जाणारा, समतोल राखणारा विकास निवडण्याची योग्य वेळ आहे.

# उपमुख्यमंत्री पवार यांच्या ताफ्यातील वाहनाची दुचाकीला धडक; चौघे गंभीर

किल्लेधारूर प्रतिनिधी

**उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे शनिवारी (दि.२२) माजलगावहुन धारूर मार्गे केजकडे जात असताना त्यांच्या ताफ्यातील अग्नीशमन गाडीने क्र.एम.एच.०२ जीएच ५७३२ एका दुचाकीस क्र.एम.एच.४४ बी १५१८ धुनकवड फाटा परिसरात धडक दिली. यामध्ये दुचाकीवर असलेले विष्णु दामोदर सुदे, त्यांची पत्नी सौ.कुसुम विष्णु सुदे व त्यांची दोन मुले गंभीर जखमी झाले. प्रथम त्यांना धारूर व नंतर अंबाजोगाई येथील रूग्णालयात दाखल करण्यात आले.**



अपघात एवढा जबरदस्त होता की दुचाकीचा चुराडा झाला आहे. स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदतकार्य सुरू करून सर्व जखमींना धारूर ग्रामीण रुग्णालयात हलवले. त्यापैकी दोघांची प्रकृती चिंताजनक असल्याची प्राथमिक माहिती आहे. या धडकेत ताफ्यातील सुरक्षा रक्षकही जखमी झाला असून त्याच्यावरही उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी रस्त्यावरील वाहतूक सुरळीत करून पंचनामा सुरू केला. अपघाताचे नेमके ▶▶ पान २ वर

# बीडच्या २४१ कोटीच्या महसूल घोटाळ्यात ईडीने उडी घ्यावी

**अधिकाऱ्यांना वाचवण्यासाठी कर्मचाऱ्यांचा बळी– वंचित आघाडी**

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्हा प्रशासनामध्ये महसूल विभागात २४१ कोटी रुपयाचा महसुली घोटाळा उघडकीस आला या ७३ कोटीचे वितरण देखील झाले आहे. लवादाने दिलेले हे नियमबाह्य मावेजा प्रकरण आता चांगलेच गाजत असून, याच्या चौकशीसाठी एसआयटीची स्थापना करण्यात आली आहे. मात्र १०० कोटी पेक्षा अधिक घोटाळा असल्याने, याप्रकरणी सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांची चौकशी करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे.**




बीड जिल्ह्यातून जाणारे राष्ट्रीय महामार्ग, अहमदनगर –बीड –परळी रेल्वे मार्ग या कामात संपादित केलेल्या जमिनीचा वाढीव मावेजा मिळवण्यासाठी अधिकारी–कर्मचारी यांनी ▶▶ पान २ वर

### तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांची स्वाक्षरी

या प्रकरणामध्ये बीडचे तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनीच मावेजा मंजूर केल्याच्या स्वाक्षऱ्या आहेत. प्रामुख्याने या स्वाक्षऱ्या बोगस असल्याचा ठपका ठेवला जातो मात्र या स्वाक्षऱ्यांची सहनिशा प्रशासनाने करावी, अशी देखील मागणी होत आहे. केवळ कर्मचाऱ्यांवर कारवाई करून या प्रकरणावर पडदा न पाडता यातील सत्य बाहेर येणे गरजेचे आहे.

# मार्चपासून सीईटी; एमएचटीसीईटी एप्रिलमध्ये

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील तंत्रशिक्षण, उच्च शिक्षण, कृषी, कला, वैद्यकीय अशा विविध शाखांतील अभ्यासक्रमांसाठी घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षांचे संभाव्य वेळापत्रक सीईटी सेलने जाहीर केले आहे. सीईटीची सुरुवात २४ मार्चपासून एमपी.एड. अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षाने होणार आहे.

यानंतर अभियंत्रिकी एमएचसीईटीच्या पीसीएम गटाची पहिली परीक्षा ११ ते १९ एप्रिल, तर पीसीबी गटाची पहिली परीक्षा २१ ते २६ एप्रिल या कालावधीत होणार आहे. विद्यार्थ्यांना दिलेल्या अतिरिक्त संधीअंतर्गत पीसीएमच्या दुसऱ्या फेरीच्या परीक्षा १४ ते १७ मे, तर पीसीबीच्या दुसऱ्या फेरीच्या परीक्षा १० आणि ११ मे रोजी आयोजित केल्या जाणार आहेत. चालू वर्षी प्रवेश परीक्षेमध्ये १४ लाख विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती, यामधील १२ लाख ४६ हजार विद्यार्थ्यांनी प्रवेश परीक्षा दिली होती. आगामी शैक्षणिक वर्षातील विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी असलेल्या १७ प्रवेश परीक्षाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. यामध्ये पदवी अभ्यासक्रमाच्या ▶▶ पान २ वर

# निवडणूक सत्तेसाठी नसते विकासासाठी असते–उपमुख्यमंत्री अजित पवार

जालना । प्रतिनिधी

**निवडणूक सत्तेसाठी नसते तर विकास काम करण्यासाठी निवडणूक असते. यासाठी सर्व समाज घटकांना सोबत घेऊन पुढे जाण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यामुळे ही निवडणूक फक्त सत्तेसाठी नसून, सर्वांगीण विकासाची दिशा ठरवणारी आहे, असे प्रतिपादन परतूर येथे नगरपालिका निवडणूक सभेसाठी आले असता उपमुखमंत्री अजित पवार यांनी केले.**



आगामी परतूर नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परतूर शहरात शनिवारी प्रचंड राजकीय उत्साह उसळला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) च्या प्रचाराला गती देण्यासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते मा. अजितदादा पवार यांनी परतूर येथे भव्य जाहीर सभा घेतली. शहरातील मुख्य चौकात झालेल्या या सभेला नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सर्व प्रभागांमधून नागरिक गटागटाने सहभागी झाले होते. सभेच्या मंचावर प्रमुखत्वाने उपस्थित असलेले मा. आ. सुरेशकुमार जेथलिया सभेचे मुख्य आकर्षण ठरले. आगामी नगर परिषद निवडणूक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सुरेश कुमारजेथलिया नेतृत्वात लढवणार असल्याची अधिकृत घोषणा या ठिकाणी करण्यात आली. ▶▶ पान २ वर

# ‘रावणाची लंकाही अहंकारामुळे जळून खाक’

**एकनाथ शिंदेंची भाजपवर नाव न घेता टीका**

पालघर । प्रतिनिधी

पक्ष फोडाफोडीच्या कथित नाराजीनाट्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालघरमधील डहाणू नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचारात भाजपवर पहिल्यांदाच नाव न घेता प्रहार केल्याचे दिसून आले आहे. डहाणूमध्ये आपण अहंकाराविरोधात एकत्र आलो आहोत, रावणाची लंकाही अहंकारामुळे जळून खाक झाली होती, असे सूचक विधान करून शिंदे यांनी राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे.

डहाणू नगरपरिषदेत भाजपचे जिल्हाध्यक्ष भरत



राजपूत यांच्या विरोधात ठाकरेसेना आणि काँग्रेसने माघार घेतल्याने आता शिंदे गट विरुद्ध भाजप असा थेट सामना रंगणार आहे. भाजपच्या ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२२ नोव्हेंबर २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १८.५० क्विंटल | २,३७५ | ३,४८१ | २,६५८ |
| ज्वारी/हायब्रिड : १३०.०० क्विंटल | २,३०० | ४,१०१ | ३,१८० |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | १,६२६ | १,६२६ | १,६२६ |
| तूर : ०.५० क्विंटल | ३,००० | ३,००० | ३,००० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी:४७.०० क्विंटल | २,०११ | ३,१८० | २,६८९ |
| मुग: ०.५० क्विंटल | ७,६०० | ७,६०० | ७,६०० |
| सोयाबीन: १३१.०० क्विंटल | ४,४०० | ४,७०० | ४,५७८ |
| हरभरा: २.०० क्विंटल | ५,२०० | ५,२०१ | ५,२०० |

# गवईंच्या कार्यकाळात 21 मागासवर्गीय न्यायाधीशांची नियुक्ती; अनुसूचित जातींमधून 10, तर 15 महिलांची नियुक्ती

नवी दिल्ली । वृतसंस्था

**भारताचे सरन्यायाधीश बीआर गवई यांच्या सुमारे सहा महिन्यांच्या कार्यकाळात देशाच्या विविध उच्च न्यायालयांमध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील दहा, इतर मागासवर्गीय आणि मागासवर्गीय प्रवर्गातील अकरा न्यायाधीशांची नियुक्ती करण्यात आली. देशाचे पहिले बौद्ध आणि दुसरे दलित सरन्यायाधीश असलेले न्यायमूर्ती गवई यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या तीन सदस्यीय मंडळाचे नेतृत्व केले.**



या मंडळाने अर्थात कॉलेजीयमने विविध उच्च न्यायालयांचे न्यायाधीश म्हणून नियुक्तीसाठी सरकारला १२९ नावांची शिफारस केली, त्यापैकी ९३ नावे मंजूर करण्यात आली. न्यायाधीश एनव्ही अंजारिया, विजय बिश्नोई, एएस चांदूरकर, आलोक आराधे आणि विपुल मनुभाई पंचोली या पाच न्यायाधीशांचीही त्यांच्या कार्यकाळात सर्वोच्च न्यायालयात नियुक्ती करण्यात आली. १४ मे रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या वेबसाइटवर अपलोड केलेल्या न्यायाधीशांच्या नियुक्तीच्या तपशीलांनुसार, न्यायमूर्ती गवई भारताचे सरन्यायाधीश झाल्यानंतर, सरकारने उच्च न्यायालयासाठी मंजूर केलेल्या ९३ नावांमध्ये अल्पसंख्याक समुदायातील १३ न्यायाधीश आणि १५ महिला न्यायाधीशांचा समावेश होता. त्यापैकी पाच माजी किंवा सेवारत न्यायाधीश होते आणि ४९ न्यायाधीश बारमधून नियुक्त करण्यात आले होते तर उर्वरित सेवा संवर्गातील होते. सरन्यायाधीश गवई रविवार, २३ नोव्हेंबर रोजी पद सोडणार आहेत आणि त्यांचे उत्तराधिकारी न्यायमूर्ती सूर्यकांत २४ नोव्हेंबर रोजी भारताचे पुढील मुख्य न्यायाधीश म्हणून शपथ घेतील. भारताचे ५२ वे मुख्य न्यायाधीश, न्यायमूर्ती गवई यांनी त्यांच्या सहा महिन्यांच्या कार्यकाळात महत्वाचे निर्णय दिले आहेत. यात वक्फ कायद्यातील प्रमुख तरतुदींना स्थगिती ▶▶ पान २ वर

## अग्रलेख

# कसे पेलणार भाजप आव्हान?

गेल्या दशकात भारतीय जनता पक्षाने ‘विकास’, ‘मजबूत नेतृत्व’ आणि ‘राष्ट्रीय अभिमान’ हे घोषवाक्य जोरदार पेटवले. पण आजच्या सामान्य नागरिकासाठी हा नारा फक्त घोषणापत्रातच अडकलेला दिसतोय. प्रश्न सोपा आहे. हा विकास खरंच जनतेच्या खिशात, घरात पोहोचतोय का, की फक्त चमकदार फटाक्यांच्या तेजावर राजकीय रंगमंच सजवला जात आहे? भाजपच्या स्वप्नांना रात्रीच्या आकाशात उजळणारी नक्षत्रे म्हणायला हरकत नाही, पण त्या नक्षत्रांना आधार देणारा मजबूत भूखंड आहे का, हा प्रश्न आता अनिवार्य बनतोय. दै. राज्य लोकतंत्र च्या वाचक वर्गाला रोजच्या थाळीत आणि खर्चात तोच प्रश्न पडतो. महागाईच्या वाढत्या दरामुळे लोकांची झोळी हलक्यासुद्धा होत नाही. रिझर्व्ह बँकेचे व्याज दर न घटवता महागाईची वेगवान चाल लोकांच्या खिशावर घाला घालते. खरेदीची क्षमता हळूहळू गळते, बचत करण्याचे स्वप्न दुर्लक्षित होते.

अर्थव्यवस्थेतील सावट दिवसेंदिवस गडद होत आहे. आर्थिक सर्वेक्षणात पुढील वर्षी जीडीपी वाढीचा दर कमी राहण्याची शक्यता, मध्यमवर्गीयांच्या मनात ताणाचे नवीन लहरी निर्माण करते. या ताणामुळे भाजपच्या ‘विकासाचे स्वप्न’ या योजनेच्या प्रत्यक्ष परिणामावर मोठा प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे. हेच नाही, तर ‘‘स्वदेशी’’ची आभासी गाणी गात असताना, पक्षप्रभावित उद्योगांना सरकारी कर्जाचा लाभ दिला जातोय. महाराष्ट्रातील काही भाजप नेत्यांच्या साखर कारखान्यांना सुमारे ४३६ कोटींचे कर्ज दिले गेले. प्रश्न असा आहे की प्रत्यक्ष गरजूंऐवजी हे निधी पक्षाच्या आर्थिक हितासाठी वापरले जातोय का? जनतेच्या डोळ्यासमोर हा पैसा कसा वाटला जातो, हा भाजपसाठी मोठा आव्हान बनतोय. स्थानिक राजकारणाची परिस्थिती आणखी गुंतागुंतीची आहे. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी तयारी जोर धरत असताना, अनेक ठिकाणी स्वतंत्र मोर्चेबांधणीचा विचार दिसतोय. ही रणनीती जनतेमध्ये स्पष्ट संदेश पोहोचवते. ‘‘लोकांचा आवाज कितीही उठला तरी सत्ता टिकवण्याच्या यंत्रणेने तो दाबला जाईल.’’ जिथे त्यांनी लोकसंवादाचा दावा केला होता, तिथे सत्ता टिकवण्यासाठी ताकदीचा वापर अधिक स्पष्ट झाला आहे. भाजप जेव्हा विकासाच्या नावावर ‘‘शक्तीचे स्वप्न’’ पांढऱ्या कपड्यांत मिरवतो, तेव्हा वास्तविकतेत जनतेला तो कपडा फाटलेला दिसतोय. सामान्य नागरिकांच्या आशा, त्यांची आर्थिक माळ, घरगुती सुरक्षा हे फक्त शब्दांतच बंदिस्त आहेत का, हा प्रश्न भाजपला समजून घ्यावा लागतो.निवडणूक काळात प्रचार, झब्बू जाहिराती, अठोर अपील या माध्यमातून पक्ष लोकांना मंत्रमुग्ध करतो, पण वास्तवात त्यांचा ‘‘४०० जागांचा लक्ष्य’’ कितपत साध्य होईल, हा प्रश्न लोकांसमोरील तपासणीला येतो. चमकदार प्रचाराने लोक आकर्षित होऊ शकतात, पण रोजच्या जगण्याच्या समस्यांवर त्यांनी खरा प्रतिसाद दिला पाहिजे, हे भाजपला सिद्ध करणे गरजेचे आहे.या संकटकाळात भाजपने जनतेला फक्त वादविवादात हरवण्याचा प्रयत्न करू नये. प्रत्यक्षात ‘जनतेचा विकास’ साधता येईल का, हे दाखवावे लागेल. व्हाऊचर्स, पेट्रोल सबसिडी, बांधकाम प्रकल्प हे फक्त उद्घाटन आणि घोषणांपुरते मर्यादित राहू नयेत. परिणाम लोकांच्या खिशात, रोजच्या खर्चात, कर्जात दिसायला हवा. सामान्य नागरिक म्हणतो: ‘‘राजकीय भाषणात मोठी कागदपट्टी आहे, पण ती आमच्या झोळीत नाही.’’ भाजपने हे लक्षात घ्यावे, कारण जनता फक्त झाकलेल्या राजकीय रंगमंचावर उभ्या राहून तोंड उघडणार नाही. ती धन्यवाद, पण तुम्हाला चाचणी घेऊन ये हिच अपेक्षा करते. जनतेचा विश्वास परत मिळवायचा आहे का, किंवा घोषणांची वाटचाल फक्त निवडणुकीच्या वर्षापुरती मर्यादित आहे का, हा प्रश्न भाजपला समजून घ्यावा लागेल. विकासाचा नारा फक्त पोस्टर्समध्ये रुजू होतोय का, हे लोक जाणतात. आणि जर वास्तवात बदल न झाला, तर त्या चमकदार घोषणांची तेजस्वी गाणी गळून पडतील, आणि लोकांचा आवाज ती पर्वा न करता उठेल. लोक आपलं भविष्य स्वतः घडवू इच्छितात. भाजपने त्यांना फक्त आश्वासन नव्हे, तर प्रत्यक्ष बदलाची संधी द्यावी. वादविवादावर नव्हे, वास्तवावर लक्ष केंद्रित करून जनतेचा विश्वास परत मिळवणे गरजेचे आहे.

# जुजगव्हण यात्रेत जुगार अड्ड्यावर छापा, पुजा पवार यांच्या पथकाची कारवाई

**घाटसावळी । प्रतिनिधी**

**तालुक्यातील पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जूजगव्हाण येथे सुरट नावाचा जुगार सुरु असल्याची माहिती पोलिसांना मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी पुजा पवार यांच्या पथकाने शुक्रवारी(दि.२१) रात्री कारवाई करत ३२,९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.यावेळी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले.**



मागील काही दिवसांपासून पोलिसांचा अवैध ,जुगार अड्ड्यांवर कारवाईचा सपाटा सुरु असून बीड तालुक्यातील पिंपळनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जूजगव्हाण येथे सोरट नावाचा जुगार सुरु असल्याची पोलिसांना माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी बीड यांच्या पथकाने शुक्रवारी(दि.२१) रात्री कारवाई करत २१,९८० रुपयांची रोकड व ११,००० रुपयांचा मोबाईल असा एकूण ३२,९८० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. अजय घनश्याम चांदबोधले (वय २७ रा.भीमनगर दिंद्रुड ता. माजलगाव) व योगेश बाबूराव राऊत (वय २९ रा.गुंज ता.घनसांगवी) या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.दरम्यान ही कारवाई सचिन आगलावे,कुलदीप औसरमल यांच्यासह इतरांचा समावेश होता.

# मदतीचा यज्ञ अविरत तेवत ठेवणाऱ्या भाजप उमेदवार शुभम धुत यांना पसंती

**बीड । प्रतिनिधी**

सामाजिक कायकर्ते तथा एकेकाळचे शिवसेनेचे दिग्गज नेते. दिलीप धुत यांचे चिरंजीव शुभम धुत हे बीड नगर परिषद निवडणुकीत प्रभाग क्रमांक दोन मधुन नगरसेवक पदाची निवडणुक लढवत आहेत. सेवा अन्? समाज कार्यात धुत परिवाराचे योगदान अतुलनीय आहे. कोरोना महामारी असो या दिपावली, पाडवा असे सन उत्सव. दिलीप धुत व शुभम धुत परिवाराचा मदतीचा महायज्ञ अखंड तेवत राहतो.याच तळागाळातील माणसाला दिलेल्या मदतीच्या हातामुळे प्रभाग क्रं २ मधुन शुभम धुत व त्यांचे सहकारी विजयी होणार आहेतच.परंतु, शुभम धुत यांच्या उमेदवारीची संपुर्ण बीड शहरात जोरदार चर्चा आहे. अडचण कोणाचीही अन्? कसलीही असो मदतीची अपेक्षा करत धुत परिवाराच्या ऑफिसमध्ये गेलेला माणूस कधीच रिकाम्या हाताने परत येत नाही, ही दिलीप धुत परिवाराने जपलेली परंपरा आहे. अतिशय नम्र, सोज्वळ, प्रामाणिक आणि प्रत्येकाला आपलेसे वाटतात अलीकडच्या काळात राजकारणाचा प्रचंड



### मदतीची भावना ठेवणारा नगरसेवक

वर्षापुर्वी कोरोना महामारीचे प्रचंड भीषण असे संकट आले. सारे जग ठप्प झाले हातावर पोट असलेल्या लोकांची उपासमार होऊ लागली. या काळात शुभम धुत यांनी मदतीचा यज्ञ पेटवत तो तब्बल तीन वर्षे तेवत ठेवला. हजारो लोकांना किराना किट, कपडे आदी मदत केली.

चुतडा झाला आहे. अशा परिस्थितीतही काही लोकांनी सामाजिक व सामाजाभीमुख कार्यातुन राजकारणाचा आब राखला आहे. त्यापैकीच एक दिलीप धुत यांचा परिवार. जिथे कमी तिथे मी म्हणत सामान्य माणसाच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार्या प्रश्न, अडचणी घेऊन येणाऱ्याचे समाधान करणारे शुभम दिलीप धुत हे बीड नगर परिषद निवडणुकीत वार्ड क्र. २ मधुन निवडणुक लढवत आहेत प्रत्येकाला मदतीचा हात देणाऱ्या कोरोना महामारी असो या दसरा, दिवाळी अथवा पाडवा अशा प्रसंगी मदतीचा पेटारा उघडणार्या परिवारातील शुभम धुत यांना नाही तर कोणाला निवडुण द्यायचे? असा सवाल करत मतदारांचे उत्स्फुर्त असे पाठबळ शुभम धुत यांना मिळत आहे.

# पोलीस भरतीसाठी जातप्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त व इतर प्रमाणपत्रात अडथळे

## अडचणी आल्यास आ.सुरेश धस प्रतिष्ठाण मदत कक्षाशी संपर्क करा–माऊली जरांगे

**आष्टी । प्रतिनिधी**

**पोलीस भरती प्रक्रियेत जात प्रमाणपत्र, प्रकल्पग्रस्त व इतर प्रमाणपत्राची आवश्यकता भासणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना तहसील कार्यालय तसेच उपविभागीय अधिकारी कार्यालयात विविध तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने, मराठवाडाभूषण लोकनेते सुरेश धस प्रतिष्ठान तर्फे विद्यार्थ्यांना तातडीचा दिलासा देण्याचा प्रयत्न सुरु करण्यात आला असून आष्टी,पाटोदा,शिरूर कासार मतदारसंघातील मुलांनी या पार्श्वभूमीवर माऊली जरांगे यांनी संबंधित अडचणी आल्यास थेट संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.**





जात प्रमाणपत्र,प्रकल्पग्रस्त व इतर प्रमाणपत्र मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांकडे प्रकल्पाच्या मूळ संचिका, वारस नोंद सातबाऱ्यावर, ना हरकत प्रमाणपत्र, मृत्यू प्रमाणपत्र तसेच कमी–जास्त पत्रक यांसारखी कागदपत्रे पूर्ण असणे अत्यावश्यक आहे. मात्र, ही कागदपत्रे उपलब्ध नसणे, अथवा कार्यालयीन स्तरावर होणारी दिरंगाई यामुळे अनेक तरुणांना प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होत आहे.भूसंपादन अधिकारी तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांकडे प्रमाणपत्र हस्तांतरण किंवा पडताळणी प्रक्रियेदरम्यान अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांना अनावश्यक त्रास सहन करावा लागत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. त्यामुळे प्रमाणपत्राची आवश्यकता असणाऱ्या पोलीस भरतीच्या उमेदवारांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या परिस्थितीवर तोडगा म्हणून ‘मदत कक्ष’ कार्यरत करण्यात आली आष्टी तालुक्यात प्रविण पोकळे मो.९९२१४२७१२७ पाटोदा तालुक्यात माऊली जरांगे मो.८६९८५३७४७४,शिरूर तालुक्यात गणेश भांडेकर ९८२२७५९७५१ यांना संपर्क करावा मूळ नोंदी असलेले विद्यार्थी तातडीने संपर्क साधू शकतील, असेही मराठवाडा भूषण लोकनेते आ.सुरेश आण्णा धस प्रतिष्ठानच्यावतीने जि. प.सदस्य माऊली जरांगे यांनी कळविले आहे.

# बिबट्यापासून सुरक्षेसाठी दिवसा वीजपुरवठा करण्याची आ.सुरेश धस यांची मागणी

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टीपाटोदाशिरूर (कासार) तालुक्यातील शेतकऱ्यांना सुरक्षिततेची भीषण परिस्थिती निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, बीड येथील कार्यकारी अभियंत्यांना औपचारिक निवेदन सादर करून दिवसा वीजपुरवठा देण्याची तातडीची मागणी केली आहे.**

मागील काही दिवसांपासून या तीनही तालुक्यातील अनेक गावांमध्ये बिबट्याचे वारंवार दर्शन होत असून नागरिकांसह शेतकरी भयभीत आहेत. विशेषतः रात्री आणि पहाटेच्या वेळी बिबट्याची हालचाल वाढत असल्याने रब्बी पिकांना पाणी देणे, कांद्याची लागवड, तसेच ऊसतोडणीसारखी कामे मोठ्या अडचणीत आली आहेत. ऊसतोडणी मजूरदेखील रात्रीच्या वेळी काम करण्यास स्पष्ट नकार देत आहेत.सध्या महावितरणकडून शेतीपंपांना रात्री १२ ते पहाटे ६ या वेळेत वीजपुरवठा केला जातो. मात्र, या काळात बिबट्याचा धोका अत्यंत जास्त असल्याने शेतकरी शेतात जाणे टाळत आहेत. शेतीची सर्व कामे ठप्प झाले असून ही परिस्थिती लक्षात घेता शेतीपंपांसाठी दिवसभरात किमान ८ ते १० तास सातत्याने वीजपुरवठा देण्यात यावा, अशी आमदार धस यांनी निवेदनाद्वारे मागणी केली. दिवसा वीजपुरवठा उपलब्ध झाल्यास शेतकरी सुरक्षितपणे कार्यरत राहू शकतील तसेच ऊसतोडणी मजुरांना देखील भयमुक्त वातावरणात काम करणे शक्य होईल, असे त्यांनी निवेदनात स्पष्ट केले.शेतकऱ्यांच्या सुरक्षेला आणि हंगामी पिकांच्या तातडीच्या गरजेला प्राधान्य देऊन महावितरणने या मागणीची त्वरित दखल घ्यावी असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आहे. आष्टी तालुक्यातील म्हसोबावाडी,घाटापिंपरी, धामणगाव रोडवरील घाटा पिंपरी जवळील घाट परिसरात वनविभागाच्या परिक्षेत्रात बुधवार दि.१९ नोव्हेंबर रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास बिबट्याचे दर्शन झाल्याचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडावरून दर्शन करून परत येत असताना आष्टी सद्गुरु ग्रुपच्या युवकांना बिबट्या नगर–बीड महामार्ग ओलांडताना दिसला.या भागात वन्यप्राण्यांची वर्दळ वाढल्याने या महामार्गावरून जाणाऱ्या प्रवाशांनी सतर्कता बाळगावी विशेषता दुचाकी वरील प्रवाशांनी सावधगिरीने या मार्गावरून प्रवास करावा परिसरातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन वनविभागाकडून करण्यात आले आहे.

# जि.प.बांधकाम विभागात कामे ठप्प; विकासाला खीळ

## मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांच्या अकार्यक्षमतेमुळे सर्व कामे ठप्प आहेत. निधीची उपलब्धता नाही, त्यामुळे सर्व कामे थांबली आहेत. महापुरुषाचे पुतळे, संरक्षण भिंत, अंतर्गत रस्ते, फर्निचर, विद्युतीकरण आदी कामे थांबली आहेत. पाठपुरावा नसल्याने मागणी करूनही निधी मिळालेला नाही. तर दुसरीकडे बीड जिल्हा परिषदेतील रिक्त पदांमुळे कामे होत नाहीत. अशी ओरड करण्यात येत असली तरी अधिकाऱ्याचा अकार्यक्षमपणा आणि अर्थपूर्ण व्यवहारामुळे किरकोळ कामेही होत नाहीत. बांधकाम विभागातील सर्वच कामाचा आढावा घेऊन विकास कामांना गती द्यायला हवी. अशी मागणी करण्यात आली आहे.**

बीड जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाच्या क्रमांक २ साठी मोमीन नावाचे कार्यकारी अभियंता कार्यरत आहेत. खालचे अधिकारी, कर्मचारी ऐकत नाहीत. कामांना गती येत नाही, अशी त्यांची ओरड असते. किरकोळ कामे आणि दुरुस्तीही नाही. अतिवृष्टीमुळे बीड जिल्हा परिषदेच्या तळमजल्यात पाणी घुसले होते. सदर पाणी काढण्यासाठी पाच– सहा दिवस लागले. करोडो रुपयांच्या इमारीसाठी तळ मजल्यावरील पाणी खेचण्यासाठी पंप बसविण्यात आलेला नाही. यातून अधिकाऱ्याची निष्क्रियता आणि कर्तव्यशून्यता दिसून येते. खाऊगिरी वाढल्यामुळे किरकोळ कामातही काही मिळते का? हे पहिले जाते. बांधकाम विभागातील कारभार ढेपाळला कार्यकारी अभियंता बांधकाम नं. १ प्रमाणेच कार्यकारीअभियंत बांधकाम विभाग नं. २ विभागातील कारभार ढेपाळला आहे. आर्थिक गैरव्यवहार आणि अकार्यक्षमता यामुळे ते रजेवर गेले आहेत. कारवाईच्या भीतीपोटी ते रुजू व्हायला तयार नाहीत. या विभागातही अनियमितता वाढली आहे. बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी जिल्हा परिषदेच्या दोन्ही विभागात लक्ष घालून किमान किरकोळ कामांना गती द्यावी. कामचुकार आणि अकार्यक्षम कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना वठणीवर आणावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

## पान १ वरून...

### फक्त आकड्यांचा खेळ

८९९ शेतकऱ्यांनी जीवन संपवले असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. सरकारकडे लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींना द्यायला पैसे नाहीत. शेतकऱ्यांना जाहीर केलेले ३२ हजार कोटींचे पॅकेज हे फसवे असल्याची टीका त्यांनी केली होती. पीक विम्याचा मुद्दाही त्यांनी याआधी उपस्थित केला होता. पीकविमा योजनेच्या नावाखाली लाखो कोटी रुपयांचा फायदा विमा कंपन्यांना देणारे हेच सरकार, शेतकऱ्यांच्या खात्यात केवळ पाच रुपये टाकून नुकसानभरपाई दिल्याचे नाटक करत असल्याचा आरोप त्यांनी केला. या शेतकरीविरोधी फडणवीस सरकारला जनता लवकरच त्यांची जागा दाखवून देईल, असा इशारा त्यांनी दिला.

--------------

### ‘अतिवृष्टी’चे ९८४ कोटी

माहिती पंचनामा पेमेंट पोर्टलवर दाखल झाली असून त्यापैकी पीक नुकसान झालेल्या ६,८५,५४९ शेतकऱ्यांच्या खात्यात ४४०.५१ कोटी रुपये, रब्बी पेरणीसाठी पात्र ६,४६,३१६ शेतकऱ्यांच्या खात्यात ५०७.९८ कोटी रुपये अशाप्रकारे एकूण ९४८.४९ कोटी रुपये थेट लाभार्थींच्या बँक खात्यात जमा झाले आहेत.

---------------

### बीडच्या २४१ कोटीच्या महसूल

शेतकऱ्यांना हाताशी धरून लवादासमोर वाढीव प्रस्ताव दाखल केले. जवळपास २४१ कोटी रुपयांचे हे वाढीव मावेजा असून लवादाने विरुद्ध पार्टीचा कोणताही पुरावा सादर न करता यातील ७३ कोटी रुपयांचे वितरण केले. विशेषता यामध्ये अधिकारी–कर्मचारी, तेथील कंत्राटी कर्मचारी यांसह वकील देखील सहभागी होते विशेषता या सर्वावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या घोटाळ्याची व्याप्ती वाढत असताना, याच्या चौकशीसाठी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी एसआयटीची स्थापना केली आहे. मात्र हा घोटाळा मोठा असून, अधिकाऱ्यांच्या संगणमताने तो झाल्याचा आरोप करत अधिकाऱ्यांना वाचवण्यासाठी कर्मचाऱ्यांचा बळी दिला गेला असल्याचा आरोप होत आहे. या प्रकरणांनी राज्यभर खळबळ उडाली आहे. तेव्हा आता ईडीने देखील यात हस्तक्षेप करावा, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे युवक नेते उद्धव खाडे यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

----------

### उपमुख्यमंत्री पवार यांच्या

कारण अद्याप समजले नसले तरी ताफ्याचा वेग, अचानक समोर आलेली दुचाकी किंवा रस्त्यावरील गर्दी यापैकी कोणत्या कारणामुळे अपघात झाला याची चौकशी सुरू आहे. घटनेनंतर परिसरात काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. मात्र पोलिसांनी तातडीने परिस्थिती नियंत्रणात आणली. या अपघातामुळे परिसरात खळबळ उडाली असून पुढील तपास सुरू आहे.

**अजितदादा आता तरी रस्त्याची रुंदी वाढवा**

तेलगाव ते धारूर हा राष्ट्रीय महामार्ग धुनकवाड ते घाटा पर्यंत खुपच अरूंद रस्ता आहे. दोन वाहनांना साईट घेताना चालकास तारेवरची कसरत करावी लागते. अरूंद रस्त्यामुळे या मार्गावर शेकडो अपघात होऊन अनेकांचा बळी गेल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे धुनकवाड ते घाट रस्त्या दरम्यान रस्त्याचे रुंदीकरण करण्यात यावे, अशी मागणी नागरिक, प्रवाशांसह वाहन चालक सातत्याने करत आहेत. मात्र निगरगट्ट शासन याकडे कायम दुर्लक्ष करत आहे. आता उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या ताफ्यातील गाडीचाच अपघात अरूंद रस्त्यामुळे झाल्याने. ना.अजित दादा पवार यांनी आता तरी या रस्त्याचे रुंदीकरण करावे, अशी मागणी होत आहे.

--------

### ‘रावणाची लंकाही

उमेदवाराविरोधात सर्वपक्षीयांनी मोट बांधल्याने या संघर्षाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ठाणे, पालघर आणि नवी मुंबई या जिल्ह्यांमध्ये भाजपकडून शिंदे गटातील कार्यकर्त्यांना फोडले जात असल्याची चर्चा आहे. याच नाराजीतून शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेऊन गाऱ्हाणे मांडले आहे. मात्र, या भेटीनंतरही त्यांची नाराजी दूर झाली नसल्याचे चित्र आहे. पाटण्यात नितीशकुमारांच्या शपथविधीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे वेगवेगळ्या मार्गाने पोहोचले आणि भेटीदरम्यानही त्यांच्यात कोरडेपणा दिसून आला. दरम्यान, कल्याण डोंबिवलीपाठोपाठ धाराशिवमध्येही सेना–भाजपमध्ये तणाव वाढला आहे. धाराशिवमध्ये एका विवाह सोहळ्यात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्र्यांची भेट टाळल्याची चर्चा आहे, ज्यामुळे दोन्ही पक्षांतील तणाव कायम असल्याचं स्पष्ट होत आहे. भाजप–शिवसेनेतील हा तणाव आता डहाणूच्या निवडणुकीच्या निमित्ताने अधिक उघड झाला असून, भाजप यावर काय उत्तर देणार, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

----------

### निवडणूक सत्तेसाठी नसते विकासासाठी

आपल्या प्रभावी भाषणात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार म्हणाले, परतूर शहराला अनेक वर्षांपासून सक्षम, दूरदर्शी आणि विकासाभिमुख नेतृत्वाची गरज आहे. परतूरच्या प्रत्येक नागरिकाचा विश्वास जिंकून विकासासाठी सातत्याने काम करणारे नेते म्हणजे सुरेशकुमार जेथलिया. नगर परिषदेत राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता आली तर परतूरचा चेहरामोहरा बदलून टाकू. त्यांनी विकास प्रकल्पांवरील अडथळे हटवण्याची स्पष्ट हमी दिली. परतूर शहरातील निधीअभावी किंवा राजकीय हेतूंमुळे प्रकल्पांना आलेले अडथळे दूर करण्यासाठी राज्य सरकार पूर्णपणे कटिबद्ध असल्याचे अजित पवार यांनी सांगितले. जेथलिया यांनी घेतलेल्या पुढाकारांना राज्य सरकार संपूर्ण पाठिंबा देईल. परतूरच्या विकासाला आता कुणीही अडवू शकत नाही, असे स्पष्ट आश्वासन त्यांनी दिले. या सभेत परतूरच्या राजकारणात महत्त्वाची घटना घडली. काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ जिल्हा उपाध्यक्ष आर. के. खतिब यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) मध्ये जाहीर प्रवेश केला. खतीब येणे हे राष्ट्रवादी काँग्रेससाठी मोठे बळ ठरले असून, या प्रवेशामुळे सभेत उपस्थित कार्यकर्त्यांचा उत्साह शिगेला पोहोचला. नुकत्याच झालेल्या राजकीय घडामोडींमुळे परतूरमध्ये निवडणुकीची हवा अधिकच तापली असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सभा म्हणजे या प्रचाराला मिळालेली मोठी उभारी मानली जात आहे. सभेला महिला, युवक, व्यावसायिक यांची मोठी गर्दी होती. राज्य सरकारचा पाठिंबा, जेथलिया यांचा स्थानिक प्रभाव, आणि पक्ष नेतृत्वाचा विश्वास या सगळ्यांच्या जोरावर आगामी परतूर नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा पलडा अधिक जड दिसत असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. या वेळी माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण, आमदार सतीश चव्हाण, महिला जिल्हाध्यक्ष मंगलाताई पाटील, रवींद्र तौर, मधुकर अर्दाड, बडीराम कडपे, नाजेर काजी, शेख महेमूद आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

------------

### मार्चपासून सीईटी;

१२ प्रवेश परीक्षा तर पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या ५ प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहेत. या प्रवेश परीक्षा सकाळी व दुपारी या सत्रात ऑनलाईन पद्धतीने घेतल्या जातील. तर काही प्रवेश परीक्षा सायंकाळच्या सत्रात देखील घेतल्या जातील. एमएच सीईटी पीसीएम समूहाची पहिली प्रवेश परीक्षा ११ एप्रिल ते १९ एप्रिल २०२६ मध्ये होणार असून दुसरी प्रवेश परीक्षा १४ मे ते १७ मे २०२६ मध्ये होणार आहे. तर एमएच सीईटी पीसीबी समूहाची पहिली प्रवेश परीक्षा २१ एप्रिल ते २६ एप्रिल २०२६ मध्ये होणार असून दुसरी प्रवेश परीक्षा १० मे व ११ मे २०२६ मध्ये होणार आहे. एमबीए/एमएमएस या अभ्यासक्रमासाठी पहिली प्रवेश परीक्षा ६ एप्रिल ते ८ एप्रिल २०२६ मध्ये होणार असून दुसरी प्रवेश परीक्षा ९ मे २०२६ मध्ये होणार आहे.

--------

### गवईंच्या कार्यकाळात २१ मागासवर्गीय

देणारे, न्यायाधिकरण सुधारणा कायदा रद्द करणारे आणि केंद्राला प्रकल्पांना पोस्टफॅक्टो ग्रीन मान्यता देण्याची परवानगी देणारे निर्णय समाविष्ट आहेत. शुक्रवारी गवई यांचा शेवटचा कामकाजाचा दिवस होता. पूर्ण समाधानाने आणि वकील आणि न्यायाधीश म्हणून चार दशकांचा प्रवास पूर्ण करून न्यायाचा विद्यार्थी म्हणून संस्था सोडत आहे असे भावूक उद्गार त्यांनी काढले होते.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. २३ नोव्हेंबर २०२५


## थोडक्यात

### अतिवृष्टीचे अनुदान बँकेने कर्ज खात्यात जमा करू नये –प्रा.आंधळे

बीड । प्रतिनिधी



शासनाने शेतकऱ्यांना दिलेले अतिवृष्टीचे अनुदान बँकांनी कर्ज खात्यात जमा करू नये अशी मागणी बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी शासनाकडे केली आहे पुढे जून ते सप्टेंबर दरम्यान संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये प्रचंड प्रमाणात अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असल्यामुळे शासनाने त्यांची दखल घेऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून शेतकऱ्यांच्या खात्यावर प्रत्येकी दहा हजार रुपये जमा केले आहेत त्यामुळे शेतकऱ्यांना थोडासा दिलासा मिळाला पण अनेक बँकांनी शासनाने शेतकऱ्यांना दिलेल्या अनुदानाचे शेतकऱ्याचे बँक खाते बँका होल्ड करीत असून शासनाने शेतकऱ्यांना दिलेले अनुदान हे कर्ज खात्यात जमा करत आहेत त्यामुळे शेतकरी प्रचंड आर्थिक अडचणीत सापडला आहे अतिवृष्टीने झालेले नुकसान प्रचंड आहे मदतीचा हात म्हणून शासन शेतकऱ्यांना आर्थिक मदत करत आहे पण बँकांनी या अनुदानावर डोळा ठेवून ते कर्ज खात्यात जमा केल्यास शेतकऱ्यावर मोठ्या प्रमाणावर अन्याय होणार आहे तेव्हा याकडे तात्काळ शासनाने व जिल्हा प्रशासनाने लक्ष देऊन शासनाने शेतकऱ्यांना दिलेले अतिवृष्टीचे अनुदान बँक कर्ज खात्यात जमा करू नये अशी मागणी बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकार द्वारे केली आहे.

### सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक गुंडाजी विठ्ठलराव एडके यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक गुंडाजी विठ्ठलराव एडके यांचे आज शनिवार २२ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारच्या सुमारास अल्पशा आजाराने दुख:द निधन झाले. निधना समयी त्यांचे वय ८५ वर्षे होते. त्यांच्या पार्थिवावर उद्या दिनांक २३ रोजी सकाळी १०:३० वाजता अंतिम संस्कार करण्यात येणार आहे.



सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक गुंडाजी विठ्ठलराव एडके यांचा स्वभाव शांत संयमी आणि मनमिळाऊ असा होता. त्यांचा मनमोकळा स्वभाव असल्यामुळे त्यांचे सर्वांशी संबंध चांगले होते.त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये पोलीस खात्याची प्रामाणिकपणे सेवा केली. या काळात गोरगरीब नागरिकांना त्यांचे सदैव सहकार्य असायचे. पोलीस ठाण्यामध्ये एखाद्या गोर गरिबावर अन्याय झाला असे निदर्शनास आल्यास ते त्याच्या न्यायासाठी प्रयत्न करत होते. त्यांच्या विचारांवर थोर साधू संत, महंतासह युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा मोठा पगडा होता. त्यांचे शिक्षण आणि पोलीस खात्यावर विशेष प्रेम होते. त्यामुळे आपल्या तिन्ही मुलांना त्यांनी उच्चशिक्षित केले. तर दोन्ही मुलांना पोलीस खात्यात भरती केले. मागील काही दिवसांपूर्वी घरात अचानक चक्कर येऊन खाली पडल्याने जखमी झाले होते. त्यांच्यावर जालना शहरातील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. आज शनिवार २२ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारच्या सुमारास त्यांचे निधन झाले. त्यांच्या पार्थिवदेहावर उद्या रविवार दिनांक २३ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजता अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत.सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक गुंडाजी विठ्ठलराव एडके यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन सुना, एक मुलगी, जावाई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. एडके परिवारावर कोसळलेल्या दुःखात दै.राज्य लोकतंत्र परिवार सहभागी आहे.

# पदाने अभियंता लाज वाटावी अशी एक हजाराची लाच घेताना पकडला

गेवराई । प्रतिनिधी

**पंचायत समितीमध्ये स्थापत्य अभियांत्रिक सहाय्यक म्हणून कार्यरत असलेले विनायक मिठू राठोड यांनी गायगोठा च्या फाईल साठी एक हजार रुपयाची मागणी केली. या मागणीची पडताळणी लाज लूचपत प्रतिबंध खात्याने केल्यानंतर विनायक राठोड यांनी लाच स्वीकारण्याचे मान्य केले. मात्र तक्रारदार वेळेवर न आल्याने विनायक राठोड यांनी लाच घेण्यास मज्जाव केला. व ते शिरसदेवी येथे निघून गेले. मात्र सर्व पुराव्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक खात्याचे पोलीस उपाधीक्षक सोपान चित्तमपल्ले यांनी विनायक राठोड यांना गजाआड केले.**



गेवराई येथील पंचायत समितीमध्ये गाय गोठा फाईलवर सही करण्यासाठी विनायक राठोड यांनी एक हजार रुपयाची मागणी केली ही रक्कम स्वीकारण्याचे मान्य केले. अंबिका चौकाच्या बाजूच्या एका खाजगी गाळ्यामध्ये ही कारवाई होणार होती. मात्र ऐनवेळी राठोड शिरसदेवीला निघून गेले. तक्रारदारास भेटण्याचे त्यांनी टाळले दुसऱ्या दिवशीही कारवाई यशस्वी होऊ शकली नाही. मात्र तरीही सबळ पुराव्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक खात्याचे पोलीस उपाधीक्षक सोपांन चित्तमपल्ले यांनी राठोड यांना ताब्यात घेतले. त्यांच्याविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. याशिवाय त्यांच्या खाजगी कार्यालयामध्ये झडती घेतल्यानंतर दहा हजाराचा मोबाईल, कार्ड ,चाव्या आदी जप्त केले. याशिवाय घराची झडती घेण्यात आली. मात्र घरात काय सापडले हे अद्याप कळू शकले नाही. ही कारवाई पोलीस उपाधीक्षक सोपान चित्तमपल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली राहुलकुमार भोळ, समाधान कवडे, सुरेश सांगळे, पांडुरंग काचगुंडे, मच्छिंद्र बिडकर, अनिल शेळके, अमोल खरसाडे, अविनाश गवळी, प्रदीप सुरवसे, संतोष राठोड, राजकुमार आघाव चालक गणेश म्हेत्रे आदींनी केली.

## पोलिस उपनिरीक्षक राजाभाऊ गुळभिले यांच्या संवेदनशील उपक्रमामुळे हरवलेल्या आजींची सहा वर्षांनी कुटुंबाशी पुनर्भेट

बीड । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील तीगाव वस्ती येथील रहिवाशी ९० वर्षाची गयाबाई जाधव ही वयोवृद्ध महिला बेशुद्ध अवस्थेत शहरातील बस स्टॅन्ड एरियात एका सामाजिक कार्यकर्त्याला आढळल्याने त्याने तशाच अवस्थेत बीड येथील बेघर जिव्हाळा निवारा केंद्रामध्ये दाखल केले. बेघर जिव्हाळा केंद्राच्या टीमने तिला कोरोनाच्या काळात उपचारासाठी शासकीय दवाखान्यात ॲडमिट केले. सात आठ दिवसांनी तिची प्रकृती उत्तम झाल्यानंतर बेघर निवारा केंद्राचे संचालक अभिजीत वैद्य, व्यवस्थापक राजू वंजारे, व काळजीवाहक छायाताई सरोदे यांनी बेघर जिव्हाळा केंद्रात तिला दाखल करून घेण्यात आले. निवारा केंद्रामध्ये गेली सहा वर्षापासून आजीला वेळोवेळी औषधोपचार देऊन उत्तमरीत्या देखभाल करून सांभाळले. माणुसकीची भावना आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर याचा



उत्कृष्ट नमुना तिगाव येथे पाहायला मिळाला. मागील सहा वर्षांपासून कुटुंबापासून दुरावलेल्या गयाबाई बाबुराव जाधव यांच्या बाबतची माहिती पोलिस उपनिरीक्षक राजा भाऊ गुळभिले यांनी आपल्या व्हॉट्सॲप स्टेटसमध्ये शेअर केली होती. या छोट्या प्रयत्नातून मोठी मदत झाली आणि हरवलेल्या आजींचा शोध लागला गया बाई जाधव यांना त्यांच्या मूळ गावी त्यांच्या सून भागाबाई बन्सी जाधव यांच्यामार्फत दि.२२ नोव्हेंबर २०२५ शनिवार रोजी पाठवताना एक छोटेखानी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या यावेळी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. संजय तांदळे, पोलीस उपनिरीक्षक राजू गुळभिले, विजय जाधवर,दै. किसानचे कार्यकारी संपादक अदनान खान, तसेच पोलीस कर्मचारी सिद्धांत गोरे, राहुल गायकवाड, दत्ता कदम, सिद्धार्थ खुडूक, व सोमनाथ कुचेकर आदींची उपस्थिती होती. बेघर निवारा केंद्राच्या वतीने आजींचा सन्मान करून त्यांना साडी व शाल देत निरोप देण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी आजींच्या सुरक्षित पुनर्वसनाचा आनंद व्यक्त करत, समाजातील संवेदनशीलतेचे हे उदाहरण सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले.कार्यक्रमादरम्यान बोलताना पोलीस अधिकारी व सामाजिक कार्यकर्त्यांनी म्हटले की,एका छोट्या संदेशानेही एखाद्या व्यक्तीचे आयुष्य बदलू शकते. समाजातील प्रत्येक घटकाने अशा उपक्रमात हातभार लावावा.गया बाईच्या कुटुंबीयांनीही पोलिस, सामाजिक कार्यकर्ते व निवारा केंद्राचे आभार मानत त्यांच्या भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.कार्यक्रमाची प्रस्तावना अभिजीत वैद्य सूत्रसंचालन राजू वंजारे, व आभार काळजीवाहक छायाताई सरोदे यांनी मानले. कार्यक्रमास बेघर निवारा केंद्रातील लाभार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

## पान ६ वरुन...

### बीड न.प.अध्यक्ष पदासाठी

पराभूत करण्यासाठी बीड शहरातील बौद्ध, मातंग, चर्मकार, वाल्मिकी, वडार व अनुसूचित जामातीमधील समाज बांधवांसह आंबेडकर समाज बांधवांची निर्णायक बैठक सोमवार दि.२४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता हॉटेल नीलकमल, नगर रोड बीड येथे बैठक आयोजित करण्यात आली आहे.

तरी या निर्णायक बैठकीस बीड शहरातील सर्व आंबेडकरी समाज बांधवांनी दि. २४ नोव्हेंबर २०२५ सोमवार रोजी ठीक १० वाजता हॉटेल नीलकमल, नगर रोड बीड येथे उपस्थित रहावे. असे आवाहन बीड शहरातील सर्वपक्षीय संघटनांच्या पदाधिकाऱ्यांकडून करण्यात येत आहे.

### बाळराजे पवार व पप्पू

नगरपरिषदेच्या निवडणुकीत अजित दादा पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसला एकही मत न देता त्यांच्या सर्व उमेदवारांना पराभूत करण्याचे आवाहन करून बीडच्या पंडितांची राजेशाही वेशीच्या बाहेर फेकून देऊ, असा खणखणीत इशारा त्यांनी दिला. त्यानंतर गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजयसिंह पंडित यांनी झालेल्या चुकीबद्दल प्रसार माध्यमासमोर येऊन पप्पू कागदे यांची जाहीर माफीही मागितली. पप्पू कागदे व शिवछत्र परिवारातील वाद अजून शमलेला नसतानाच गेवराई नगर परिषद निवडणुकीतील भारतीय जनता पार्टीचे पॅनल प्रमुख तथा युवानेते बाळराजे पवार यांनी शुक्रवार, दिनांक २१ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी बीडला जाऊन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे युवा प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांची त्यांच्या कार्यालयात जाऊन भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत प्रभाग क्रमांक ६ मधील भाजपाचे उमेदवार महेश सौंदरमल, प्रभाग क्रमांक ७ मधील उमेदवार सुमित्रा नाना थोरात, प्रभाग क्रमांक ८ मधील उमेदवार सोनाली सुतार यांचे वडील, ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते आवर्जून उपस्थित होते. बाळराजे पवार व पप्पू कागदे यांची बंद खोलीत तब्बल एक तास चर्चा झाल्याचे समजते. चर्चेचा तपशील मात्र समजू शकला नाही. या भेटीमुळे बीडच्या ''शिवछत्र'' परिवारात खळबळ उडाली असून पप्पू कागदे यांच्या नाराजीचा बीड जिल्ह्यासह गेवराई नगर परिषदेच्या निवडणुकीत अजित दादा पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसला फटका बसणार असल्याचे बोलले जात आहे.

### बीड नगर परिषदेची

निधी बीडसाठी दिलेला आहे. मी तुमचा आणि ना. अजितदादा यांच्यामधील मध्यस्थ आहे. तुमचे सर्व प्रश्न माझ्या मार्फत मी त्यांच्यापर्यंत नेऊन ते सोडवण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करीन त्यासाठी नगर परिषदेची सत्ता आपल्या हातात येणे गरजेचे आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेना आणि शिवसंग्राम पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह सर्व नगरसेवक पदाचे उमेदवार बहुमताने विजयी करा असे आवाहन आ.विजयसिंह पंडित यांनी केले. बीड शहरातील प्रभाग क्र.१ व १२ मध्ये मतदारांशी संवाद साधताना ते बोलत होते.बीड नगर परिषद निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेना आणि शिवसंग्राम पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती प्रेमलता पारवे यांच्यासह प्रभाग क्र.१ चे उमेदवार सौ.सविता भास्कर जाधव आणि काळे धनंजय बाळासाहेब तर प्रभाग १२ मधील उमेदवार सौ.मोरे सिता भैय्यासाहेब, सौ.जवकर सारीका सचिन यांच्या प्रचारार्थ आ. विजयसिंह पंडित यांनी या दोन्ही प्रभागाचा झंझावाती प्रचार दौरा करून मतदारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले की, कमी कालावधीत जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजितदादा पवार यांनी कोट्यावधी रुपयांचा निधी बीडसाठी मंजुर करून आणला. अंडरग्राऊंड लाईट, स्टेडीयमसाठी निधी, आयटी पार्क, रखडलेला रेल्वे मार्ग अशा अनेक कामांसाठी निधी उपलब्ध करून दिला. ना.अजितदादा हे बारामतीचे आहेत हे सांगण्याची आवश्यकता नाही. आपल्या बीड शहराला बारामती सारखे सुंदर बनविण्यासाठी आपण सर्वांनी गट-तट मतभेद विसरून राष्ट्रवादी आणि मित्रपक्षाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आणि नगरसेवक पदाचे उमेदवार भरघोस मताने विजयी करून ना.अजितदादांच्या हातात नगर पालिकेची सत्ता द्या, विकास काय असतो हे आम्ही दाखवून देऊ असेही ते यावेळी म्हणाले.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, पक्षाचे निरीक्षक माजी आमदार संजय दौंड, सावता परिषदेचे कल्याण आखाडे, बळीराम गवते, निसारभाई, माजी नगरसेवक भास्कर जाधव, कृष्णा वनगुजरे, रमेश चौरे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शिवसेना (शिंदेगट) आणि शिवसंग्रामचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मतदारांनी आ.विजयसिंह पंडित यांचे जंगी स्वागत केले. ठिकठिकाणी महिला भगिनींनी त्यांचे औक्षण करून त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. दरम्यान आ. विजयसिंह पंडित यांनी उपस्थित पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह केलेल्या प्रचार दौऱ्यामुळे मतदारांमध्ये उत्साह संचारला आहे.

### शेकाप नेते भाई बाळासाहेब

बीड शहरातील बारकुल हॉस्पिटलमध्ये उपचार चालू होते. उपचार चालू असतानाच शुक्रवारी सायंकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्यावर शनिवारी दुपारी बारा वाजता पिंपळादेवी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी चळवळीतील कार्यकर्ते, परिसरातील नागरिक, नातेवाईक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या वतीने माजी आ. राजेंद्र जगताप, माजी आ. जनार्दन तुपे यांनी श्रद्धांजली वाहिली.

### अजित पवारांच्या व्हिजन मधुन

मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते, मेळाव्याला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष मुस्लिम आणि अल्पसंख्यांक समाजाला न्याय देवु शकतो, त्यासाठी सर्वांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला बळ देण्याची गरज असल्याचे जेष्ठनेते एस.वाय. अन्सारी यांनी आपल्या प्रास्तविक भाषणात सांगुन नगर परिषदेत परिवर्तन करण्याचे आवाहन केले. शहरात अतिशय अल्पावधीत केलेल्या विकास कामांची माहिती देतांना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, विरोधक गुंडगिरी आणि दहशतीची भाषा बोलत आहेत, त्यांच्याकडे केलेली कामे सांगण्यासारखे काही नसल्यामुळे ते हवालदिल झाले आहेत. विधानसभा निवडणुकीनंतर केवळ अल्पसंख्यांक समाजासाठी पाच कोटी रुपयांची विकास कामे करतांना आजवरचे अनेक प्रलंबित प्रश्न निकाली काढल्याचे त्यांनी सांगितले. विकासाचा रथ पुढे चालु ठेवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.यावेळी महिलांची उपस्थिती लक्षणिय होती.

### तुटपुंजे अनुदान आले

श्री .राकेश गीड्डे यांच्या अध्यक्षतेखाली येत्या मंगळवारी दिनांक २५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ११ .००वाजता तहसील कार्यालय ,केज येथे तालुक्यातील सर्व राष्ट्रीयकृत,सहकारी बँकांचे शाखा व्यवस्थापक,महसूल तलाठी ,मंडळ अधिकारी व अतिवृष्टी मूळे नुकसानग्रस्त शेतकरी यांची संयुक्त आढावा बैठकीचे आयोजन केल्याचे पत्र तहसीलदार श्री. राकेश गीड्डे यांनी दि.१८नोव्हेंबर २०२५ रोजी निर्गमित केले आहे.

## प्रभाग १३ मध्ये अफसानाबी सलीम सय्यद यांची उमेदवारी प्रबळ

### नगरपालिकेच्या राजकारणात बापूंची 'आंबेडकरवादी छबी' यश देणार

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव नगरपरिषदेतील प्रभाग १३ मध्ये अफसानाबी सलीम सय्यद यांची उमेदवारी अत्यंत प्रबळ मानली जात आहे. माजलगावच्या राजकारणात सय्यद सलीम यांचे मोलाचे योगदान, आंबेडकरवादी विचारसरणी आणि समता-न्यायाच्या मूल्यांविषयी असलेली आत्मीयता यामुळे त्यांचे स्थान नागरिकांमध्ये मानाचे आहे. प्रभाग १३ हा परंपरेने आंबेडकरवादी नागरिकांचा प्रभाग म्हणून ओळखला जातो. सामाजिक न्यायाच्या प्रश्नांवर सातत्याने भूमिका घेणाऱ्या या प्रभागात सय्यद सलीम यांचे नेहमीच पारडे जड राहिले आहे. सर्वसमावेशक भूमिकेमुळे ते सर्व समाजघटकांत मिसळून कार्य करतात. त्यामुळे त्यांच्या घराण्यातील उमेदवारीची प्रतिस्पर्धी उमेदवारांना स्पष्ट धास्ती बसलेली दिसत आहे.



स्थानिक नागरिकांशी केलेल्या चर्चांमध्ये एक सूर वारंवार येतो सलीम बापूंच्या पत्नी अफसानाबी सहज निवडून येतील.प्रभागातील मतदारांचा विश्वास, सलीम बापूंची अनेक वर्षांची सार्वजनिक कामे, सुसंवादी स्वभाव यामुळे त्यांच्या उमेदवारीचा आत्मविश्वास प्रबळ झाल्याचे दिसून येते. येत्या निवडणुकीत प्रभाग १३ मध्ये अफसानाबी सय्यद यांची उमेदवारी आंबेडकरवादी चळवळीचे एका मजबूत केंद्र म्हणून उभारी घेणारा निर्णायक क्षण ठरेल, असे नागरिकांचे मत आहे.

प्रभाग १३ मध्ये सलीम बापूनी नेहमीच विकास, स्वच्छता, पाणीपुरवठा आणि रस्त्यांची सुधारणा यांसारख्या मूलभूत मुद्द्यांना प्राधान्य दिले आहे. त्यांची व्यवहारकुशलता, प्रशासकीय अधिकाऱ्यांशी सातत्याने संवाद ठेवण्याची सवय आणि लोकांच्या छोट्या-मोठ्या अडचणींसाठी उपलब्धता यामुळे त्यांचे पारडे सध्या जड आहे.

## मालेगाव मधील घटना जिवाला चटका लावणारी- राजेंद्र आमटे

**आरोपीला कठोरात कठोर शासन करा**

बीड । प्रतिनिधी

मालेगाव येथील घटना जिवाला चटका लाऊन जाणारी आहे. कोवळ्या जीवावर झालेला प्रकार मानवतेला काळीमा फासणारा असून या प्रकरणातील आरोपीवर कठोरात कठोर शिक्षा करण्यात यावी अशी मागणी शेतकरी आघाडीचे जिल्हाप्रमुख राजेंद्र आमटे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली.



दिवसेंदिवस अत्याचाराच्या घटनेत वाढ होत आहे. अल्पवयीन मुलींनाही यातून सुटका मिळत नाही. किती दिवस आम्ही फक्त निषेध करायचा, बलात्कार करणाऱ्याला भर चौकात फाशी दिली पाहिजे. उत्तर कोरिया प्रमाणे बलात्कार करणाऱ्या नराधमाच्या तीन पिढ्या तुरुंगात टाकल्या पाहिजेत. त्याचे आई, वडील तो नराधम व त्याची पुढची पिढी ह्या तुरुंगात टाकल्या पाहिजेत. या देशात बलात्कार थांबवण्यासाठी कठोर पावले उचलली पाहिजेत. बलात्कार करणारा कोणीही असो त्याच्या तीन पिढ्यांना शिक्षा दिली पाहिजे तर या देशात लेकी बाळीचे बळी जाणार नाहीत. घटना घडल्यानंतर निषेध, मोर्चे काढले जातात मात्र अशा प्रकारातून गुन्हे नियंत्रणात आणणे शक्य होत नसल्याचे दिसत आहे दिवसेंदिवस अशा घटना वाढत आहेत त्यामुळे अत्याचाराच्या घटनेत तात्काळ तपास करून कमी कालावधीत आरोपी वर गुन्हा निश्चित केला पाहिजे. त्यानंतर वास्तव परिस्थिती समोर ठेवून आरोपी हा शिक्षेस पात्र ठरलाच पाहिजे तरच असे प्रकार थांबतील अन्यथा कायद्यातील पळवाटा शोधून आरोपी शिक्षेपासून दूर राहत असल्याने अशा घटना वाढत आहेत त्यामुळे मालेगाव प्रकरणातील आरोपीला कठोरात कठोर शिक्षा करा अशी मागणी शिवसंग्राम किसान आघाडीचे जिल्हाप्रमुख राजेंद्र आमटे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

# शिक्षणमंत्र्यांचा संवेदनशील निर्णय- बाजीराव ढाकणे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे सन्माननीय शिक्षणमंत्री दादा भुसे साहेब यांनी महाराष्ट्रातील सर्व शाळांमध्ये शिकणाऱ्या विधवा,घटस्फोटीत,परित्यक्ता अशा एकल महिलांच्या मुलांची संख्या संकलित करण्याचे आदेश काढून एक संवेदनशील निर्णय घेतला आहे असे महाएनजिओ फेडरेशन चे बीड जिल्हा समन्वयक तथा लेक लाडकी अभियानाचे श्री बाजीराव ढाकणे यांनी म्हटले आहे. या महिलांचे अल्प शिक्षण,रोजगाराची संसाधने नसणे,सासर माहेरचा अनेकींना आधार नसणे अशा स्थितीत त्या मुलांना फार शिकवू शकत नाहीत ही बाब सन्माननीय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या निदर्शनास आणून देण्यात आली होती हाच धागा पकडून मंत्री महोदय यांनी तातडीने उचित ठरेल अशी प्रक्रिया सुरू केली आहे त्याबद्दल महाएनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्य व लेक लाडकी अभियान महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने सन्माननीय मंत्री महोदय भुसे यांचे बाजीराव ढाकणे यांनी आभार मानले आहेत.

मध्यंतरी शिक्षण मंत्री यांच्यासोबतच्या बैठकीत या महिलांचे दुःख सांगितले व मुलांसाठी काही करण्याची विनंती केली पण विशेष म्हणजे या महिलांसाठी काही करण्याचे त्यांच्या मनात होते असे त्यांनी सांगितले आणि त्याप्रमाणे त्यांनी केलेही.

शिक्षण विभागात शाळांमध्ये सर्व वंचित घटकांची आकडेवारी असते पण आजपर्यंत एकल महिलांच्या मुला मुलींची आकडेवारी नव्हते. त्यामुळे नेमकी संख्या समोर नसल्याने या मुलांच्या शिक्षणासाठी काही निर्णय करता येत नाहीत.



पण आता प्रत्येक शाळेत व एकूण राज्यात किती एकल महिलांची मुले आहेत ही आकडेवारी आल्याने शिक्षण विभाग या मुलांच्या शिक्षणासाठी काही निर्णय घेऊ शकेल.

उदाहरणार्थ १० वी १२ वी ची फी माफ करायची असा निर्णय घ्यायचा तर आजपर्यंत संख्याच माहीत नव्हती. पण आता या संख्येमुळे एकल महिलांची मुले मुली हा अजेंडा बनू शकेल.शाळेतील शिक्षक ही आपल्या शाळेत किती विद्यार्थी आहेत ही संख्या बघून त्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, फी माफी , सहल अशा प्रत्येक बाबतीत लक्ष घालतील..यापूर्वी अनेकजण करायचे पण आता अधिक सजगपणे होईल.या एकल महिलांच्या दोन मुलांना प्रत्येकी २२५० रुपये दरमहा बालसंगोपन योजनेचा लाभ मिळतो पण बहुसंख्य एकल महिलांना ही योजनाच माहीत नाही.आमच्या राज्यातील शिक्षकांनी फक्त या योजनेची नुसती माहिती जरी या महिलांना करून दिली तरीसुद्धा हजारो मुलांना वर्षाला २७ हजार रुपये मिळतील. एकल महिला आपल्या मुलांना फार शिकवत नाहीत, मुलींचे बालविवाह करतात.पण जर इतकी मोठी रक्कम मिळाली तर नक्कीच त्या मुला मुलींनी शिकवतील.

एकल महिलांच्या मुलांची संख्या मागवल्याने एकूणच संपूर्ण शिक्षण विभाग संवेदनशील होईल त्यामुळे हा निर्णय खूप महत्वाचा आहे. मंत्री महोदय भुसे साहेब यांचे स्वीय सहाय्यक यांनी ही यात महत्वाची भूमिका निभावली आहे. आदरणीय हेरंब दादा कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली साऊ एकल महिला समितीच्या माध्यमातून आम्ही एकल महिलांचे राज्यभर काम करतो. महिलांना विविध योजना मिळवून देतो पण त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी घेतलेला पुढाकार आमच्या सर्व कार्यकर्त्यांचा या कामात उत्साह वाढवणारा आहे. त्यामुळे सन्माननीय शिक्षण मंत्री महोदय यांचे आमच्या साऊ एकल महिला समितीच्या वतीने आभार

# 'जीएम' तंत्रज्ञानाबाबत सरकारला मर्यादा- कृषिमंत्री चौहान

जीएम तंत्रज्ञानाबाबत आमच्या मर्यादा आहेत. जीएमऐवजी जिनोम एडिटिंगच्या माध्यमातून भारतीय शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा पर्याय उपलब्ध करून दिला जाईल. शेतीक्षेत्रात मनुष्यबळ उपलब्धतेचा अडसर लक्षात घेता खासगी आणि आयसीएआर संस्थांच्या सहकार्यातून यांत्रिकीकरणाच्या क्षेत्रातही संशोधनावर भर देण्याचे प्रस्तावित आहे,'' असे प्रतिपादन केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी केले.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या पुढाकाराने आयोजित केलेल्या १६ व्या ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनाचे उद्घाटक म्हणून चौहान बोलत होते. या वेळी व्यासपीठावर गडकरी, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, डॉ. पंकज भोयर, आमदार सुधीर मुनगंटीवार, एनडीडीबीचे अध्यक्ष मिनेश शाह यांची उपस्थिती होती. चौहान पुढे म्हणाले, की नागपूरची ओळख संत्र्यासाठी आहे. त्या पार्श्वभूमीवर आम्ही दर्जेदार रोपांसाठी क्लिन प्लँट सेंटरची उभारणी करणार असून,



त्याकरिता ७० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मोठ्या रोपवाटिकाधारकांना चार कोटी आणि मध्यमसाठी २ कोटी अनुदान योजना आहे. यामुळे गुणवत्तापूर्ण रोपे मिळतील.

डाळमिलसाठी २५ लाख रुपयांची अनुदानाची योजना राबविली जाणार आहे. गडकरी यांनी, संत्रा, ऊस पिकांत एआय तंत्रज्ञानासाठी एसओपी तयार असल्याचे सांगितले. तंत्रज्ञानातूनच येत्या काळात पिकाची उत्पादकता आणि दर्जा सुधार शक्य असल्याचा दावा केला.

अकोला कृषी विद्यापीठाच्या कामगिरीत सुधारणा झाली आहे, असेही ते म्हणाले. श्री. भरणे यांनी संत्रा पिकासाठी स्वतंत्र धोरण ठरविले जाणार असल्याचे सांगितले.

कापूस नोंदणी आणि खरेदीची गती मंद असल्याबाबत चौहान यांना विचारणा केली असता ते म्हणाले, की कापसात यंदा ओलावा अधिक आहे. त्यावर काय तोडगा काढता येतो या संदर्भाने भारतीय कृषी संशोधन परिषद आणि सीसीआय प्रतिनिधींची बैठक झाली.

सीसीआयकडून व्यावसायिक स्तरावर कापसाची खरेदी होते. त्यामुळे त्या मुद्यावर फारसे काही करण्यासारखे नाही, अशी बाब पुढे आली. नोंदणीची गती मंद आहे, ही शेतकरी स्तरावरची बाब आहे, असे सांगून त्यांनी यावर बोलणे टाळले.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१९२४ : एडविन हबल यांनी 'देवयानी'ही एक आकाशगंगा आहे असे प्रतिपादन केले.
१९५५ : कोकोज आयलंड्स या बेटांचा ताबा इंग्लंडकडून ऑस्ट्रेलियाकडे देण्यात आला.
१९३६ : लाइफ मॅगझिन हे फोटो मॅगझिन म्हणून पुन्हा प्रकाशित झाले.
१९७१ : चीनने संयुक्त राष्ट्रांच्या बैठकीत प्रथमच भाग घेतला.
१९९२ : आयबीएम सायमन हा पहिला स्मार्टफोन प्रकाशित करण्यात आला.
१९९९ : नागपूरचे संस्कृत महाकवी व संस्कृत पत्रकार डॉ. श्रीधर भास्कर वर्णेकर यांना या क्षेत्रातील कठोर तपश्चर्येबद्दल 'अप्पाशास्त्री राशिवडेकर पुरस्कार' प्रदान

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

८७० : बायझँटाईन सम्राट अलेक्झांडर यांचा जन्म. (मृत्यू: ६ जून ९१३)
१७५५ : थॉमस लॉर्ड लॉर्डस क्रिकेट ग्राउंडचे संस्थापक (मृत्यू: १३ जानेवारी १८३२)
१८८२ : वालचंद हिराचंद दोशी उद्योगपती (मृत्यू: ८ एप्रिल १९५३)
१८९७ : निराद सी. चौधरी साहित्य अकादमी पुरस्कार विजेते (१९७५) बंगाली/इंग्लिश लेखक. १९५१ मधे त्यांचे 'ॲन आटोबायोग्राफी ऑफ ॲन अननोन इंडियन' हे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. त्याच्या १४ आवृत्त्या निघाल्या. (मृत्यू: १ ऑगस्ट १९९९ लॅथबरी रोड, ऑक्सफोर्ड, इंग्लंड)
१९२३ : नागनाथ संतराम तथा 'ना. सं.' इनामदार लेखक (मृत्यू: १६ आक्टोबर २००२)
१९२६ : सत्यनारायण राजू ऊर्फ 'सत्य साईबाबा' आध्यात्मिक गुरू (मृत्यू: २४ एप्रिल २०११)
१९३० : गीता दत्त अभिनेत्री आणि गायिका (मृत्यू: २० जुलै १९७२)
१९६१ : पापा जॉन पिझ्झा चे संस्थापक जॉन साटनर यांचा जन्म.
१९६७ : गॅरी कर्स्टन दक्षिण अफ्रिकेचे क्रिकेटपटू, प्रशिक्षक
१९८४ : अमृता खानविलकर अभिनेत्री वालचंद हिराचंद दोशी उद्योगपतीवालचंद हिराचंद दोशी उद्योगपती

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९३७ : जगदीशचंद्र बोस नोबेल पारितोषिक विजेते भारतीय वनस्पतीशास्त्रज्ञ, वनस्पतींमधील प्रतिक्षिप्त क्रियांवर मूलभूत संशोधन (जन्म: ३० नोव्हेंबर १८५८)
१९५९ : 'नटवर्य' चिंतामणराव कोल्हटकर अभिनेते व निर्माते (जन्म: १२ मार्च १८९१)
१९७० : सिंगापूर देशाचे पहिले अध्यक्ष युसूफ बिन इशक यांचे निधन. (जन्म: १२ ऑगस्ट १९१०)
१९८९ : भारतीय-अमेरिकन अभिनेत्री मरले ओबर्नॉन यांचे निधन. (जन्म: १९ फेब्रुवारी १९११)
१९९३ : ब्रूनो रॉस्सी पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रामुळे होणार्या वैश्विक किरणांच्या विकीरणा विषयी संशोधन करणारे इटालियन-अमेरिकन पदार्थवैज्ञानिक (जन्म: १३ एप्रिल १९०५ व्हेनिस, ईटली)
१९९९ : कुमुद सदाशिव पोरे अर्थतज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या
२००० : बाबूराव सडवेलकर चित्रकार, कलासमीक्षक, महाराष्ट्राचे कलासंचालक (जन्म: २८ जून १९२८ सावंतवाडी, सिंधुदुर्ग, महाराष्ट्र)
२००६ : झेटा मासिकचे सहसंस्थापक जेस ब्लँकोनेलसला यांचे निधन. (जन्म: १४ नोव्हेंबर १९३६)

## तुरीचे उत्पादन वाढवायचे असल्यास या उपायांचा अवलंब करा



तूर हे भारतातील एक महत्त्वाचे कडधान्य पीक आहे. हे पीक सलग किंवा मुख्यत: आंतरपीक म्हणून इतर पिकात घेतले जाते. परंतु अनेकदा या पिकाच्या उत्पादनात घट येते. तूर पिकामध्ये वेळोवेळी काही गोष्टींचा अवलंब केल्यास उत्पादनात वाढ रता येते.

तूर पिकाच्या ओळींमध्ये खांडण्या : दोन झाडांतील अंतरानुसार मजुरांद्वारे खांडण्या भरणे आवश्यक आहे. काही ठिकाणी डोबणी २-३ वेळा करून खांडण्या बुजवणे आवश्यक आहे.

निंदणी : ट्रॅक्टर किंवा बैलजोडीने पेरणी केलेल्या तूर पिकाची निंदणी वेळीच करणे आवश्यक आहे. सोयाबीनसोबत आंतरपीक असल्यास सोडओळ (पट्टापेर) पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.

शेंडे छाटणे : पीक २५ ते ३० दिवसांचे असताना शेंडे छाटून घ्यावेत. अलीकडे शेंडे छाटण्याची सुरक्षित अशी छोटी यंत्रे उपलब्ध आहेत. छाटणी केल्यानंतर बुरशीनाशकाची फवारणी करणे आवश्यक आहे.

पाणी व्यवस्थापन : शेवरा अवस्थेपूर्वी आणि शेंगांमध्ये दाणे भरताना ओलीत करणे आवश्यक आहे. जमिनीत मुबलक ओल असल्यासच शेंडे छाटणे आवश्यक आहे.

रोग आणि किडींचे नियंत्रण : शेवरा अवस्थेच्या सुरुवातीला, फुलोरा अवस्थेच्या सुरुवातीला आणि शेंगांमध्ये दाणे भरताना योग्य कीटकनाशकांचा वापर करणे आवश्यक आहे.

इतर महत्त्वाच्या गोष्टी : सलग तूर लागवडीसाठी जोडओळ पद्धतीचा अवलंब करणे आवश्यक आहे.

बीटी कपाशी आणि तूर यांच्यातील आंतरपीक पद्धतीमध्ये दोन्ही पिकांची जोडओळ पद्धतीने पेरणी करणे आवश्यक आहे. योग्य वेळी आणि योग्य प्रमाणात खते आणि सूक्ष्मसंजीवके देणे आवश्यक आहे. योग्य वेळी आणि योग्य तंत्रज्ञानाचा वापर करून काढणी करणे आवश्यक आहे. या गोष्टींचा अवलंब केल्याने तुम्हाला तुमच्या तूर पिकाचे उत्पादन निश्चितच वाढवता येईल.

## हिवाळ्यात करा बीटची शेती ; २ महिन्यात कमवा लाखो रुपये

शेती करत असताना आपल्या डोक्यात विचार एकच असतो, तो म्हणजे कमी खर्चात आणि कमी त्रासात जास्तीत जास्त उत्पादन काढणे आणि उत्पन्न कमवणे. हे करत असताना आपल्या शेतातील जमीन, परिसरातील हवामान आणि पाण्याची सोय या गोष्टीची तपासणे गरजेचे असते. आतापण जे पीक घेणार आहोत त्यासाठी हवामान पोषक आहे का? जमीन त्याप्रकारची आहे का? आणि महत्वाचे म्हणजे जेवढे पाणी सदर पिकाला लागेल, तेवढ्या पाण्याची सोया उपलब्ध आहे का? हे पाहूनच आपण पीक घेण्याचा विचार करतो. सध्याचे दिवस हे थंडीचे आहेत, सगळीकडे मोठ्या प्रमाणावर गारठा पसरला आहे. अशावेळी या वातावरणाला पोषक अशी शेती आहे ती म्हणजे बीट शेती. या शेतीच्या माध्यमातून तुम्ही अवघ्या ६० दिवसांत तब्बल लाखो रुपये कमवू शकता. हिवाळ्यात बीटची शेती करणे फायदेशीर आहे, कारण थंडीच्या हवामानात या पिकाची वाढ चांगली होते. तसेच कमी खर्चात जास्त फायदा मिळवून देणाऱ्या पिकांमध्ये बीट शेती हा सर्वात फायदेशीर पर्याय मानला जातो.

यावेळी करा पेरणी : हिवाळ्यातील थंड वातावरण बीटसाठी अतिशय उत्तम मानले जाते. अशावेळी ऑक्टोबर ते डिसेंबर असा ३ महिन्याचा काळ बीटच्या पेरणीसाठी अनुकूल राहतो. लाल, हलकी ते मध्यम जमीन आणि पाण्याची सोय असलेल्या भागात हि शेती चांगली फुलते. ६० ते ८० दिवसांत बीट हे फळ तयार होते आणि तुम्ही ते बाजारात विक्री करू शकता.



जमीन : बिटाच्या शेतीसाठी पाण्याचा चांगला निचरा होणारी, सपाट आणि सुपीक वालुकामय चिकणमाती माती सर्वोत्तम आहे. याशिवाय चिकणमाती जमिनीतही याची यशस्वी लागवड करता येते. परंतु मातीची पीएच पातळी ६ ते ७ च्या दरम्यान असावी. सगळ्यात आधी शेताची नांगरणी करावी. यानंतर तणांचे नियंत्रण करून शेतात शेणखत टाकून शेत तयार करावे. वाफ्या तयार करून आणि कड्यावर बीटरूट पेरल्यास पीक चांगले येते. बीटरूट बियाणे २ सेमी खोलीवर पेरले पाहिजे

एवढा येतो खर्च : बीट शेतीसाठी जास्त खर्च लागत नाही. समजा एक एकरात बीटाची शेती करायची असेल तर सर्वसाधारणपणे ७०० ते १,००० रुपये बियाण्याचा खर्च होईल. जमीन तयार करण्यासाठी २,००० ते ३,००० रुपये लागतील. खते तसेच औषधांसाठी ४,००० ते ५,००० रुपये खर्च होईल. पाणीपट्टी आणि मजुरांचा खर्च ३००० ते ४,००० रुपयांपर्यंत जाईल. अशा प्रकारे जास्तीत जास्त १०,००० ते १५,००० रुपयांच्या आसपास हा खर्च जाईल. या खर्चाच्या तुलनेत उत्पन्न मात्र भरघोस होईल.

एवढे मिळू शकते उत्पन्न : जर चांगल्या पद्धतीने शेती केली तर बीटचे एकरी उत्पादन १०० ते १५० क्विंटल मिळू शकते. बाजारात बीटला घाऊक दराने प्रतिकिलो ८ ते १२ रुपये तर किरकोळ बाजारात २० ते ३० रुपये भाव मिळत आहे. जर घाऊक बाजार दर १० रुपये गृहित धरला तर १२,००० किलो उत्पादनास अंदाजे १,२०,००० रुपये उत्पन्न मिळते. यातून खर्च वजा केल्यास शेतकऱ्याच्या हाती निव्वळ १,००,००० ते १,१०,००० रुपयांचा नफा सहज मिळतो. बाजारात बीटचा भाव वाढला तर या उत्पन्नात आणखी वाढ होऊ शकते. म्हणजेच काय तर बीटाची शेती करून अगदी कमी कालावधीत शेतकरी लाखो रुपये कमवू शकतो.

## हिवाळ्यात डाळिंब बागेसाठी गोणपाट, साडी की शेडनेट



थंडीच्या दिवसात डाळिंबाच्या बागेची काळजी घेणे महत्त्वाचे असते, कारण अति थंडीमुळे झाडांची पाने जळू शकतात आणि फळे तडकण्याची शक्यता असते. या काळात डाळिंब बागेचे संरक्षण कसे करावे, पाणी कधी आणि किती अंतराने द्यावे, यासह काय काळजी घ्यावी, हे समजून घेतल्यास उत्पादनात अडचण येत नाही. डाळिंब बागेत धूर किंवा बागेला गोणपाट किंवा साडीने किंवा शेड नेट बांधून थंडी पासून संरक्षण करावे. थंडीपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी संध्याकाळच्या वेळी हलके व वारंवार / तुषार सिंचन च्या सहाय्याने पाणी द्यावे.

सिंचन : सिंचनासाठी ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा. झाडाजवळचे २० टक्के क्षेत्र ओलिताखाली येणे गरजेचे असते. त्यापेक्षा अधिक क्षेत्र ओलिताखाली आल्यास, बागेत सूक्ष्म वातावरण तयार होऊन खोडांना लहान छिद्रे पाडणारे भुंगेरे व मर रोग यांचा प्रादुर्भाव वाढतो. खोडकिडीचा जास्त प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी डाळिंबाला हलक्या जमिनीत चार खोडे ठेवन वळण देणे योग्य ठरते.

बागेला मोकाट सिंचन पद्धतीने पाणी द्यावे. यामुळे जमिनीतील तापमान नियंत्रित राहण्यास मदत होते. ज्या बागेमध्ये बहर धरलेला आहे आणि फळांची वाढ होत आहे, अशा ठिकाणी पहाटेच्या वेळी धूर करावा.

बागेतील तोडलेल्या फांद्या, कचरा जाळून हा धूर तयार करता येतो. थंडी आणि धुक्यापासून बचावासाठी बागेला जाळी किंवा पातळ कापडाचे आच्छादन घालता येते.

## सकस चाऱ्यासाठी ओट

ओट पिकाचा पाला हिरवागार पौष्टिक असून खोड देखील मऊ, रसाळ व लुसलुशीत असते. चाऱ्यात कोणतेही अपायकारक द्रव्ये नसल्याने तो कोणत्याही अवस्थेत जनावरांना खाऊ घातला तरी धोका निर्माण होत नाही. लागवडीसाठी फुले हरिता, फुले सुरभी, केंट युपिओ -०१-१ , जे. एच.ओ.२००४-४ जे एच.ओ.७२२ या वाणांची लागवड करावी.

ओट हे गहू पिकासारखे दिसणारे परंतु गव्हापेक्षा थोडे उंच वाढणारे महत्त्वाचे चारा पीक आहे. काही भागात या पिकास सातू असे म्हणतात. या पिकास थंड हवामान चांगले मानवते. हा चारा हा पोषक आणि चविष्ट असून त्याचा वापर जनावरांना हिरवा चारा, भुसा अथवा मुरघास म्हणून सुध्दा केला जातो. ओट हे १५० सेंमी पर्यंत उंच वाढणारे भरपूर फुटवे देणारे पीक आहे.

पाला हिरवागार पौष्टिक असून खोड देखील मऊ, रसाळ व लुसलुशीत असते. त्यामुळे हिरवा चारा जनावरे आवडीने खातात. चाऱ्यात कोणतेही अपायकारक द्रव्ये नसल्याने तो कोणत्याही अवस्थेत जनावरांना खाऊ घातला तरी धोका निर्माण होत नाही. दुभत्या जनावरांना या पिकाचा चारा दिल्यास दुधाच्या प्रमाणात वाढ होतेच शिवाय दुधातील स्निग्धांशाचे प्रमाण वाढते.

जमिनीचा प्रकार : ओट हे चारा पीक क्षारयुक्त अथवा पाणथळीच्या जमिनी वगळून इतर सर्व प्रकारच्या जमिनीत घेतले जाते. पाण्याचा उत्तम निचरा असणारी जमीन या पिकास चांगली मानवते. खत व पाणी पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्यास हलक्या जमिनीमध्ये लागवड यशस्वीरित्या करता



येते. मात्र अशा जमिनीत चाऱ्याचे उत्पादन थोडे कमी मिळते. ओट हे थंड हवामानात चांगले येते. कमी अथवा जास्त दमट हवामान या पिकास अपायकारक आहे.

मशागत : हे तंतुमय मुळे असणारे पीक आहे. जमिनीत हवा खेळती राहण्यासाठी एक खोल नांगरट करून १ ते २ कुळवाच्या पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. जमिनीचा चढ-उतार लक्षात घेता पिकास समप्रमाणात पाणी देण्याच्या दृष्टीने ६ ते ७ मीटर लांब आणि ३ ते ४ मीटर रुंद वाफे तयार करावेत.

पेरणीचा कालावधी : पिकास थंड हवामान चांगले मानवत असल्याने पेरणीपासून ते फुटवा येईपर्यंत पिकास जास्तीत जास्त थंडीचा कालावधी मिळणे आवश्यक आहे. दुसरी कापणी चांगली येण्याकरिता पेरणी नोव्हेंबर पहिल्या पंधरवड्यात करावी. पेरणीसाठी हेक्टरी १०० किलो उत्तम प्रतीचे बियाणे वापरावे. पेरणी ३० सेंमी अंतरावर करावी किंवा बियाणे फोकून सारे पडावेत,दंड पाडून पाणी द्यावे.

सुधारित वाण : फुले हरिता, फुले सुरभी, केंट युपिओ -०१-१ , जे. एच.ओ.२००४-४ जे एच.ओ.७२२

खत व्यवस्थापन : हिरवा चारा उत्पादनासाठी योग्य खतांची मात्रा वेळेवर देणे गरजेचे आहे. पेरणीपूर्वी हेक्टरी ३ ते ४ टन चांगले कुजलेले शेणखत अथवा कंपोस्ट खत जमिनीत मिसळावे. एक कापणी घ्यावयाची असल्यास पेरणीपूर्वी हेक्टरी ४० किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश द्यावे. नत्र खताचा दुसरा हप्ता हेक्टरी ४० किलो, पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी खुरपणीनंतर द्यावा. दुसऱ्या कापणीस योग्य असणारे वाण उदा. फुले हरिता (आर.ओ.-१९), केन्ट या करिता हेक्टरी १२० किलो नत्र तीन समान हप्त्यात म्हणजे ४० किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ४० किलो पालाश पेरणीच्या वेळी आणि ४० किलो नत्र पेरणीनंतर २५ ते ३० दिवसांनी द्यावे. उर्वरित ४० किलो नत्र पहिली कापणी झाल्याबरोबर द्यावे, म्हणजे उत्पादनात वाढ मिळते.

पीक तण विरहित ठेवण्यासाठी एक खुरपणी ३० दिवसाच्या आत करावी. जमिनीच्या प्रतीनुसार, पीक वाढीच्या अवस्थेनुसार दर १० ते १२ दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे. मावा नियंत्रणासाठी निंबोळी अर्क ५ टक्के फवारावा.

पाणी व्यवस्थापन : एकच कापणी घ्यावयाची असेल तर पीक पन्नास टक्के फुलोऱ्यात असताना (पेरणीपासून ७० ते ७५ दिवसांनी करावी. या पिकाचे हेक्टरी ४०० ते ४५० क्विंटल उत्पादन मिळते. चारा वाळवून किंवा भुसा करून ठेवता येतो. दुबार कापणीस योग्य असणाऱ्या वाणाची पेरणी ऑक्टोबर अखेर ते नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यात करावी.पहिली कापणी पेरणीनंतर ५० ते ५५ दिवसांनी आणि दुसरी कापणी ४५ ते ५० दिवसांनी केल्यास हेक्टरी ५५० ते ६०० क्विंटल हिरवा चारा मिळतो.

# “शासनाची मदत जनतेच्या हाती” संकेताचा जनसेवेचा संदेश!

## बुलढाणा लोणार येथील सुदामती चंद्रभान सोनुने यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून दिलासा संकेत तुकाराम सानप यांच्या प्रयत्नांना यश, तात्काळ ५० हजार रूपये निधी उपलब्ध

मुंबई । प्रतिनिधी

सामाजिक बांधिलकी व लोकसेवा हाच आपला धर्म मानून काम करणाऱ्या मुंबई मंत्रालयातील आदर्श तिगावचे सुपुत्र संकेत तुकाराम सानप यांनी पुन्हा एकदा जनसेवेचा आदर्श उभा केला आहे. त्यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे बुलढाणा जिल्ह्यातील गरीब व गरजू कुटुंबातील रुग्ण सुदामती चंद्रभान सोनुने या महिला भगिनीला मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून ५० हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे.

सोनुने या गेल्या काही काळापासून मेंदू रोग गंभीर आजाराशी झुंज देत असून, उपचारासाठी मोठा खर्च होत आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या या कुटुंबासाठी एवढा खर्च परवडणारा नव्हता.



याची दखल घेत मंत्रालय प्रतिनिधी संकेत सानप यांनी वैद्यकीय कागदपत्रांसह शासन दरबारी पाठपुरावा करून मदतीची फाईल मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे पाठवली. अखेरीस त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली ५० हजार रुपयांची मदत मंजूर करून रुग्णाच्या कुटुंबाच्या हाती पोहचवण्यात आली. या मदतीमुळे सुदामती चंद्रभान सोनुने यांच्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. रुग्णालयातील वाढते खर्च, औषधोपचार व इतर वैद्यकीय गरजा पूर्ण करण्यासाठी ही मदत उपयोगी ठरणार आहे. या निर्णयाबद्दल गावकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक जनतेकडून संकेत सानप यांचे अभिनंदन होत आहे. संकेत तुकाराम सानप यांनी यावेळी भावना व्यक्त करताना सांगितले की, गरीब, शेतकरी, मजूर, दिव्यांग आणि आजारपणाशी झगडणाऱ्या प्रत्येक गरजू कुटुंबासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी हा मोठा आधार आहे. शासनाच्या प्रत्येक योजना व मदतीचा लाभ खऱ्या अर्थाने जनतेपर्यंत पोहोचला पाहिजे, यासाठी मी सतत प्रयत्नशील आहे. सुदामती चंद्रभान सोनुने यांना मदत मिळाल्याने माझ्या सेवाकार्यातील एक ध्येय साध्य झाल्यासारखे वाटते.

मुख्यमंत्री सहाय्यता निधी प्रमुख रामेश्वर नाईक यांनीही या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, “संकेत सानप यांच्यासारखे तरुण प्रतिनिधी जर अशा पद्धतीने जनतेच्या समस्यांचा पाठपुरावा करत राहिले, तर खऱ्या अर्थाने शासनाच्या योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचेल.” सुदामती चंद्रभान सोनुने यांच्या कुटुंबीयांनी या मदतीबद्दल मुख्यमंत्री, निधी प्रमुख तसेच संकेत तुकाराम सानप यांचे आभार मानले असून गावातील नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले आहे. सामाजिक कार्य आणि जनसेवा हाच मार्ग निवडलेल्या संकेत सानप यांच्या या कार्यामुळे तरुण पिढीला प्रेरणा मिळत आहे.ङ्गङ्ग “शासनाची मदत जनतेच्या हाती” हा उद्देश साध्य करताना आदर्श तिगावचे सुपुत्र संकेत तुकाराम सानप यांनी दिलेला हा दिलासा समाजातील वंचितांसाठी आशेचा किरण ठरला आहे.

## शिर्डी–हैदराबाद महामार्गावर ऊसवाहतूक ट्रॅक्टरचा कहर, ओव्हरलोडिंगमुळे अपघाताचा धोका वाढला?





खर्डा। प्रतिनिधी

शिर्डी – हैदराबाद राज्य महामार्गावरील खर्डा परिसरात ऊसतोडीचा हंगाम सुरू होताच वाहतुकीचा धोका मोठ्या प्रमाणात वाढला आहे. साखर कारखान्यांकडे ऊस नेण्यासाठी डबल ट्रॉली जोडून मर्यादेपेक्षा जास्त वजन घेणारे ट्रॅक्टर बेधडकपणे महामार्गावर धावत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. दरडवाडी वळण, आनंदवाडीचा आणि राजुरी परिसरातील उतारचढाव हे तिन्ही भाग सध्या अपघातसंकटाचे ‘हॉटस्पॉट’ ठरत आहेत.

अनेक ट्रॅक्टर चढ चढताना अचानक थांबून मागे सरकतात. ओव्हरलोडिंगमुळे इंजिनवर ताण येत असून काही वेळा ट्रॅक्टरचे पुढील टायर हवेत उचलले जात असल्याचे दिसतच या मार्गावरून प्रवास करणारी वाहन धारक गडबडलेले दिसून येतात. आनंदवाडी परिसरात तर दुपारी एक ट्रॅक्टर पुलाच्या चढावर बंद पडल्याने महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली. पाठीमागे वाहनांची लांब रांग लागल्याने प्रवासी आणि स्थानिक दोघांच्याही मनात संताप निर्माण झाला. वाहन धारकांनी रस्त्यांच्या कडेने धोकादायक परिस्थितीत वाहने काढून पुढील प्रवास करताना दिसून आले. तर ट्रकर सपाटी किंवा उताराला लागल्यावर गाण्याचा कर्कश आवाज वाढवून रस्त्याच्या मधोमध ट्रकर चालविले जातात त्यामुळे पाठी मागील वाहनांना साईड न दिल्याने ट्रकर मध्ये लांबच्या लांब रांगा लागताना दिसत आहे. सुरक्षा नियमांचे उल्लंघन ही या परिस्थितीची आणखी एक मोठी समस्या ठरली आहे. बहुसंख्य ट्रॅक्टरवर रिफ्लेक्टर नसणे, अपुरी लाइट व्यवस्था, मोठ्या आवाजातील गाणी, तसेच ट्रॉलींना योग्य ब्रेक नसणे या त्रुटींमुळे रात्रीच्या वेळी अपघाताची शक्यता अधिक वाढते. मागून येणाऱ्या वाहनांना अशा ट्रॅक्टरची कल्पना न येत असल्याने परिस्थिती अधिकच धोकादायक बनते. ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालकांना साखर कारखान्यांनी ऊस वाहतुकीसाठी योग्य नियमावली देणे, वजन मर्यादा लागू करणे व चालकांना प्रशिक्षण द्यावी, तसेच वाहतूक विभाग व पोलिसांनी संयुक्तपणे कारवाई करून ओव्हरलोडिंगवर नियंत्रण आणावे अशी मागणीही जोर धरत आहे. योग्य उपाययोजना तातडीने न केल्यास महामार्गावर कधीही मोठा अनर्थ घडू शकतो अशी भीती स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

## संस्थेमार्फत दर शुक्रवारी शहरात विशेष श्रमदान स्वच्छता मोहिम राबविण्याचा संकल्प – जिल्हाधिकारी मित्तल

जालना । प्रतिनिधी

जालना शहर महानगरपालिका व उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात स्वच्छता व घनकचरा नियंत्रणाबाबत जनजागृती करण्यासाठी विशेष स्वच्छता अभियान व श्रमदान करण्यात आले. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज चौक ते दरगड हॉस्पिटल परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली व परिसर संपूर्ण स्वच्छ करण्यात आला.

या उपक्रमा दरम्यान जालना शहरात विविध भागात व परिसरात कचरा रस्त्यावर जाळल्याचे आढळून आल्याने, महानगरपालिकेच्या सूचनेनुसार त्यांच्यावर पहिल्याच वेळेस रू. ५,०००/- दंड आकारण्यात आला. तसेच उज्जीवन स्मॉल फायनान्स बॅंकेचे मॅनेजर रशिद शेख यांनी बँकेचे वतीने महानगरपालिकेच्या शाळांना बेंच पुरवठा आणि एक घंटा गाडी मधुन देण्याची माहिती दिली आहे. जिल्हाधिकारी तथा आयुक्त श्रीमती आशिमा मित्तल येणे घेतलेल्या निर्णयामुळे .यांच्या संकल्पनेतुन शहर स्वच्छ व आकर्षक बनविण्यासाठी दर शुक्रवारी श्रमदान मोहिम जिल्हाधिकारी तथा आयुक्त, जालना शहर महानगरपालिका यांनी शहराला अधिक स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त बनविण्यासाठी दर शुक्रवारी श्रमदान मोहिम राबविण्याचा संकल्प जाहीर केलेले आहे. त्यानुसार २१ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी जवाहर बाग पोलीस चौकी येथून मोहिमेला सुरुवात झाली. त्यानंतर डॉ. राजेंद्र प्रसाद रोड, बडी सडक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मोहिमेचा समारोप करण्यात आला.





मोहिमे दरम्यान रहमानगंज, नाथबाबा मंदिर परिसर, नर–नारायण मंदिर, बँक रोड, कॉलेज रोड, पेन्शनपुरा, मोदीखान, कपडा बाजार, चाटे गल्ली, मिशन हॉस्पिटल परिसर अशा विविध ठिकाणांमधील नाल्यांची सफाई करून कचरा हटविण्यात आला. नाल्यांवर लोखंडी जाळी बसविण्याचे आदेश मा. आयुक्त यांनी दिले. काजीपुरा परिसरातील सर्व अतिक्रमणे हटवून क्षेत्र अतिक्रमणमुक्त करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच वैष्णवी कचोरी यांना स्वच्छता नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल ५,०००/दंड आकारण्यात आला. मा. आयुक्त यांनी मुर्गी तलाव येथील महापालिका शाळेला भेट देऊन शाळा मैदानात पेव्हर ब्लॉक बसविण्याचे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागास दिले. तसेच महापालिकेच्या सर्व विभागांचा व विविध सामाजिक संस्थाचे सक्रीय सहभाग या उपक्रमात मा. आयुक्त, मा. अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, सहायक आयुक्त, महानगरपालिकेचे सर्व अधिकारी व कर्मचारी, स्वच्छता निरीक्षक, सफाई कर्मचारी तसेच विविध सामाजिक संस्थाच्या स्वयंसेवकांनी एक तास श्रमदान करून सक्रिय सहभाग नोंदविला. दर शुक्रवारी शहरातील विविध ठिकाणी अशाच स्वरूपाच्या श्रमदान मोहिमा आयोजित करण्यात येणार असून, जालना शहर अधिक स्वच्छ व सुंदर करण्यासाठी नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन मा. जिल्हाधिकारी तथा आयुक्त आशिमा मित्तल यांनी केले आहे.

## अंबड नगर परिषद निवडणुकीत अध्यक्षासाठी ५ तर सदस्यासाठी ७३ उमेदवार रिंगणात

### अध्यक्ष पदासाठी तीन उमेदवारातच होणार काट्याची लढत

अंबड । प्रतिनिधी

अंबड नगर परिषद निवडणुकीत अध्यक्ष पदासाठी १२ पैकी ७ जणांनी माघार घेतल्याने रिंगणामध्ये एकूण पाच उमेदवार राहिले आहेत. यामध्ये तीन उमेदवारांत काट्याची लढत होण्याची शक्यता आहे.

अंबड नगरपालिका निवडणुकीत बऱ्याच घडामोडी घडताना दिसत आहेत. कुलकर्णी देवयानी केदार (भाजपा), चांगले श्रद्धा शिवप्रसाद (राष्ट्रवादी शरद पवार गट), पटेल सना अनम मुस्तकीम (शिवसेना शिंदे गट), कांबळे वंदना सुखदेव (अपक्ष) आणि खरात दर्शना राहुल (अपक्ष) हे उमेदवार अंबड नगरपालिकेच्या रिंगणात उतरले आहेत. यापैकी फक्त तीन उमेदवारांमध्ये खरी लढत होणार आहे. शिंदे गट, शरद पवार गट, भाजप या तिघांमध्ये अध्यक्षपदाची अटीतटीची निवडणूक होणार आहे. तसेच २२ सदस्य पदासाठी ७३ उमेदवार निवडणूक रिंगणामध्ये आहे. यामध्ये पण निवडणूक अटीतटीची होणार आहे.

## बाबासाहेब सोमधने खून; सर्व आरोपी जेरबंद

जालना। प्रतिनिधी

जालना शहरात अंबड रोडवरील जांगडे पेट्रोल पंपासमोर अहंकार देऊळगाव येथील माजी सरपंच बाबासाहेब सोमधने यांचा अत्यंत क्रूर पद्धतीने तलवारीने हल्ला करून गुरुवारी सायंकाळी निघृण खून करण्यात आल्याची घटना गुरुवारी सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास घडली होती. या प्रकरणी कदिम जालना पोलिसांनी चार आर–ोपींना अटक केली असून आरोपींना शुक्रवारी न्यायालयात हजर केले असता त्यांना चार दिवसांची पोलिस कोठडी ठोठावण्यात आली.

जालना शहरातील अंबड चौफुली परिसरात असलेल्या जांगडे पेट्रोलपंपाजवळ भरदिवसा अहंकार देऊळगाव येथील माजी सरपंच बाबासाहेव सोमधाने यांच्या खुनाच्या घटनेनंतर संपूर्ण जालना शहरात खळबळ उडाली होती, हल–लेखोरांनी





घटनास्थळी टाटा सुमो या चारचाकी वाहनातून येऊन खुनाच्या घटनेनंतर ते वाहन तेथेच सोडून देत रिक्षातून पळ काढला होता. जालना पोलिसांनी आरोपी मनोहर ऊर्फ बळीराम मच्छिंद्र सोमधने, सचिन मारुती गायकवाड, मच्छिंद्र साहेबराव सोमधने या तीन जणांना गुरुवारी उशीरा ताब्यात घेतले होते. तर चौथा आरोपी फरार होण्यात यशस्वी झाला होता. फरार झालेल्या चौथा आरोपी अर्जुन मच्छिंद्र सोमधने यास अहंकार देवळगाव शिवारातील समृद्धी महामार्गाजवळ ताब्यात घेण्यात आले. कदिम जालना पोलिसांनी चारही आरोपींना शुक्रवारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना २४ नोव्हेंबरपर्यंत पोलिस कोठडीत रवानगी करण्याचे आदेश दिले आहेत. या प्रकरणाचा तपास कदिम पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक जनार्दन शेवाळे ही करीत आहेत.

## निघून जा म्हटल्याचा राग आल्याने तरुणाने वृद्ध महिलेचे पेटविले घर

छत्रपती संभाजीनगर। प्रतिनिधी

घरातून बाहेर जा, मला माझ्या मुलीकडे जायचे आहे, असे म्हटल्याचा राग आल्याने एकाच इमारतीत भाड्याने राहणाऱ्या तरुणाने वृद्ध महिला बाहेर जाताच तिचे घर पेटवून दिले. हा धक्कादायक प्रकार गुरूवारी रात्री पावणेअकरा ते अकरा वाजेदरम्यान तारकस गल्ली, बेगमपुरा भागात घडला.

मयूर शिवप्रसाद शर्मा (३२, रा. तारकास गल्ली) असे आरोपीचे नाव आहे. फिर्यादी शांताबाई आसाराम शिंदे (७०) या संजय राठोड यांच्या इमारतीत भाड्याने पहिल्या मजल्यावर नातू हतिक सांबळे सोबत राहतात. तर ग्राउंड फ्लोरवर शिवप्रसाद ओमकारलाल शर्मा हे त्यांचा मुलगा मयूर सोबत भाड्याने राहतात. रात्री शांताबाई घरात काम करत असताना आरोपी मयूर घरात आला. आई जेवण झाले का, असे म्हणत गप्पा मारू लागला. परंतु शांताबाई यांना मुलीकडे जायचे असल्याने त्यांनी मयूरला घरातून बाहेर जा, मला मुलीकडे जायचे आहे, असे म्हटले. त्यावर मयूरने राग आल्याने, म्हतारे निघ इथून, तू गेली की मी तुझे घर जाळतो, अशी धमकी दिली. त्याच्याकडे दुर्लक्ष करून शांताबाई मुलगी वंदना इथापे (रा. ढिंबरगल्ली, बेगमपुरा) हिच्याकडे निघून गेल्या. पंधरा मिनिटांत रात्री अकराच्या सुमारास वंदना यांना गल्लीतील एकाने फोन करून तुमच्या आईच्या घराला आग लागल्याची माहिती दिली. शांताबाईसह सर्वांनी धाव घेतली. अग्निशमन व पोलिसांना बोलावून घेतले. लोकांच्या मदतीने आग विझवली. घटनेत त्यांचे २५ हजारांचे नुकसान झाले. याप्रकरणी बेगमपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तहसिल कार्यालय संगमनेर
क्र. कावि/आरटीएस/२२४८/२०२५
दिनांक /११/२०२५

**जाहीरनामा**

तमाम लोकांस या जाहीरनाम्याव्दारे कळविणेत येते की, मौजे नान्नज दुमाला येथील स.नं. २६६/१ या ७/१२ वरील इतर अधिकारातील दगड्डु भिका बाचकर व शिवलाल गुलाबचंद ही नावे कमी करुन मिळणेबाबत श्री. भाऊसाहेब दादा गुमनेर रा. नान्नज दुमाला यांनी कार्यालयास अर्ज दाखल केलेला आहे. सदचा अर्ज हा चौकशीकामी/निर्णयाकामी विचाराधीन आहे. असे असतानाही वरील दुरुस्ती संदर्भाचे अर्जासंदर्भात कोणाचेही काही एक हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन कार्यालयीन कामकाजाचे आठ दिवसांचे आत सर्व कागदपत्रांसह मे. तहसिलदार संगमनेर, तहसिल कार्यालय संगमनेर ता. संगमनेर जि अहिल्यानगर यांचे कार्यालयात समक्ष हजर राहुन आपले लेखी म्हणने सादर करावे. वरील मिळकतीसंदर्भात कोणीही काहीएक हरकत उपस्थित न केल्यास कोणाचीही काहीएक हरकत नाही असे गृहीत धरुन अर्जदार यांचे विनंतीप्रमाणे दुरुस्ती करणेबाबत उचित कार्यवाही करणेत येईल. याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस प्रसिध्द केली आहे.

कळावे
ठिकाण – संगमनेर

स्वाक्षरित
(धिरज मांजरे)
तहसिलदार संगमनेर


## जामखेड नगर परिषद : सभापती प्रा राम शिंदे, आ. रोहित पवार यांची प्रतिष्ठा पणाला

### नगराध्यक्ष पदासाठी ९ उमेदवार तर नगरसेवक पदासाठी १०२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात

जामखेड। प्रतिनिधी

जामखेड नगरपरिषद निवडणूकीत अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी १३ नगराध्यक्षांपैकी ४ उमेदवारांनी माघार घेतली. तर १२० अर्ज भरलेल्या नगरसेवकांपैकी १८ उमेदवारांनी माघार घेतली. आता नगराध्यक्षपदाचे ९ उमेदवार रिंगणात असल्याने नगराध्यक्ष पदासाठी मोठी चुरस पहायला मिळणार आहे. सभापती प्रा राम शिंदे, आ.रोहित पवार यांची प्रतिष्ठा पणाला लागणार आहे.

यामध्ये प्रामुख्याने नगराध्यक्षपदाचे भाजप, शिवसेना शिंदे गट, राष्ट्रवादी काँग्रेस (शप) पक्ष, राष्ट्रीय इंदिरा काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्ष, समाजवादी पक्ष, अपक्ष यांच्यात खरी लढत रंगणार आहे. जामखेड नगरपरिषद निवडणुक जाहीर होताच इच्छुकांच्या गर्दी दिवसागणिक वाढत गेली होती त्यानुसार नगराध्यक्ष पदाच्या १ जागेसाठी ९ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. त्यामुळे वाढत्या थंडीतही राजकीय वातावरण तापले आहे.



नगरसेवक पदासाठी जामखेड नगरपरिषद नगराध्यक्षपदासाठी १३ तर नगरसेवकपदासाठी १२० उमेदवारी अर्ज वैध झाले होते. अर्ज माघारी घेण्याच्या शेवटच्या दिवशी ४ नगराध्यक्षपदाच्या तर १८ नगरसेवक पदाच्या उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले. नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी रिंगणात भाजपाच्या प्रांजलताई चिंतामणी, संध्या राळेभात राष्ट्रवादी (शप) काँग्रेसच्या, पायलताई बाफना शिवसेना शिंदे पक्ष, सुवर्णा निमोणकर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्ष, राष्ट्रीय काँग्रेसच्या जैनब कुरैशी, समाजवादी पक्षाच्या परविन शेख, माजी प्रथम नगराध्यक्षा प्रिती राळेभात (अपक्ष), नसीम बागवान (अपक्ष), रेश्मा शेख (अपक्ष), हे ९ उमेदवार जामखेड नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारीसाठी तर २४ नगरसेवक पदासाठी १०२ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. शहरांमध्ये सध्या नगर परिषदेच्या निवडणुकीचा प्रचाराचा जोर वाढला आहे. जामखेड नगरपरिषदेच्या या सभागृहात निवडून येण्यासाठी सर्व उमेदवारांचा प्रयत्न सुरू झाला आहे.

सभापती शिंदे व आ.रोहिहत पवार यांचा कस

सभापती प्रा.राम शिंदे व आ. रोहित पवार हे राज्याचे नेतृत्व करत आहेत. त्यामुळे या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत चांगलाच कस लागणार आहे. त्यामुळे होऊ घातलेल्या नगरपरिषदच्या निवडणुकीकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. दुसरीकडे माजी नगराध्यक्षा प्रीती राळेभात या अपक्ष म्हणून नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीत उतरल्या आहेत. त्यामुळे राजकीय समीकरणे बदलणार असल्याचे दिसत आहे. तर आम आदमी पक्षाकडून राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या उमेदवारांना पाठिंबा दिला आहे. उमेदवार रेहममुन्निसा शेख यांची उमेदवारी देखील माघारी घेत राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नगराध्यक्ष यांना पाठिंबा दिला आहे. त्यामुळे निवडणूक होऊ पर्यंत अजून किती उमेदवार पाठिंबा देणार हे पाहणे अस्तुक्याचे ठरणार आहे.



# ना मोदी ना मुंदडा अंबाजोगाईकरांना हवा नवा चेहरा

## काकाजी जनतेत वारसा मात्र अलिप्त: आणखी मोदी किती दिवस?

बीड-अंबाजोगाई । प्रतिनिधी

**अंबाजोगाई नगरपालिकेमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून पापा मोदी यांचे वर्चस्व राहिले आहेत अनेक वेळा मुंदडा गटाने त्यांना मोठा विरोध केला मात्र जनतेने त्यांना स्वीकारले आता मात्र परिस्थिती वेगळी आहे मोदी मुंदडा विरोधक आहेत मात्र सत्ता दोघाकडेच आहे मोदींनीही अनेक वर्ष सत्ता भोगली पण विकास नाही नंदकिशोर मुलांचे जनतेत घुसून काम मात्र वारस अक्षय आणि आमदार नमिता मुंदडा या मात्र दूर दूर दिसत असल्याने अंबाजोगाई करांना ना मोदी मुंदडा त्यांना हवाय तिसरा पर्याय अशी चर्चा मतदारात सुरू आहे.**



### विकासाच्या मुद्द्यावर उमेदवार गप्प

**नगरपालिका निवडणूक नगराध्यक्ष पदासाठी उभे असलेल्या उमेदवाराने शहरांमध्ये कोणता विकास केला कोणती नवीन कामे आणली भविष्यामध्ये कोणता विकास करणार याबाबत काहीच बोलताना दिसत नाही केवळ भावनिकतेच्या नावावर ही निवडणूक लढवली जात आहे गेली अनेक वर्ष मोदी कडे पालखीची सत्ता तर अनेक वर्ष मुंदडाकडे मतदारसंघाची सत्ता आहे मात्र विकास दोघांकडूनही त्या पटीने झालेला दिसत नसल्याने विकासावर कोणीच बोलत नाही ही खंत मतदार व्यक्त करत आहेत.**

अंबाजोगाई नगरपालिका तशी संख्येने मोठे आहे गेल्या अनेक वर्षापासून पापा मोदी यांचे या नगरपालिकेवर वर्चस्व राहिले आहेत ज्या काळी काँग्रेस पक्षाचे जिल्ह्यात काहीही नव्हते त्या काळात पापा मोदी यांनी काँग्रेसमध्ये राहून नगरपालिका आपल्या ताब्यात ठेवली होती बीड जिल्ह्यात केवळ अंबाजोगाई हीच काँग्रेस पक्षाचे शक्ती स्थान आणि बळ होते आता मोदी यांनी काँग्रेसची फारकत घेतली आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यामध्ये प्रवेश केला ते माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांचे समर्थक आहेत या निवडणुकीमध्ये राज्यात माहिती असली तरी अंबाजोगाई मध्ये मात्र महायुतीमध्ये दोन गट असल्याने राष्ट्रवादीकडून अप्पा मोदी तर भाजपाकडून नंदकिशोर मुद्रा नगराध्यक्ष पदाच्या लढतीमध्ये आहेत असे असले तरी जनता मात्र या दोघांवरही ना खुश आहे गेली अनेक वर्ष मोदी नगरपालिकेचा कारभार पाहतात मात्र शहराचा पाहिजे तेवढा विकास झाला नाही ही खंत मतदाराच्या मनामध्ये आहे दुसरीकडे त्यांचे विरोधक नंदकिशोर मंगला यांच्या जनसंपर्कामुळे त्यांच्या सून भाजपाच्या आमदार आहेत सून आणि मुलगा कधीच जनतेमध्ये मिसळलेले दिसत नाहीत केवळ काकाजी ची पुण्याई म्हणून हे पद लोकांनी पदरात टाकले पण आता जनताच म्हणते तुम्ही आमदार आहात पालिका ही कशाला तसेच मोदींनाही तुम्ही अनेक वर्षे सत्ता भोगली पुन्हा तुम्हीच कशाला असा सवाल आता नागरिक करू लागले आहेत तेव्हा मोदी नको मुंदडा नको तिसरा पर्याय कोण याचा शोध आता मतदार घेत आहेत कधीतरी सर्वसामान्यांना नगर अध्यक्षपदाच्या खुर्चीवर बसवावी अशी अपेक्षा मोदी आणि मुंदडा यांच्याकडून व्यक्त केली जात आहे पण सत्तेची खुर्ची सुटत नाही हे त्याचे उत्तम उदाहरण म्हणावे लागेल.

## अजित पवारांच्या व्हिजनमधून विकास करण्यासाठी विजयी करा-आ.सना मलिक

गेवराई । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी फुले - शाहु - आंबेडकरांची विचारधारा सोडली नाही म्हणुनच आम्ही त्यांच्या बरोबर आहोत. अल्पसंख्यांक समाजाच्या संकट काळात सतत ते भक्कमपणे उभे रहात आहेत, अजितदादांकडे विकासाचे व्हिजन आहे. अजित पवारांच्या व्हिजन मधुन गेवराईचा विकास करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या उमेदवारांना विजयी करा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस



पार्टीच्या स्टार प्रचारक आ. सना मलिक शेख यांनी केले. संकट काळात मदतीला धावणाऱ्या हक्काच्या माणसाला निवडुण देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले.गेवराई येथे अल्पसंख्यांक समाजाच्या मेळाव्यात ते बोलत होते.

गेवराई नगर परिषद निवडणुकीतील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार यांच्यासह प्रभागातील सर्व उमेदवारांच्या प्रचारासाठी राष्ट्रवादीच्या स्टार प्रचारक आ. सना मलिक शेख, आ. विजयसिंह पंडित आणि माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत अल्पसंख्यांक ◀◀ पान ३ वर

## बाळराजे -पप्पू कागदे यांच्या भेटीने गेवराईतील वातावरण बदलू लागले

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई नगर परिषद निवडणुकीतील भारतीय जनता पार्टीचे पॅनल प्रमुख तथा युवानेते बाळराजे पवार यांनी शुक्रवारी दुपारी बीडला जाऊन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे युवा प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांची त्यांच्या कार्यालयात जाऊन भेट घेतल्याने बीडच्या ''शिवछत्र'' परिवारात खळबळ झाली आहे.

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून बीड नगर परिषदेच्या अध्यक्षपदासाठी रिपब्लिकन पार्टी



ऑफ इंडियाचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या इच्छेनुसार उमेदवारी देण्याचे निश्चित झाले होते. निवडणुका जाहीर होताच बीडच्या ''शिवछत्र'' परिवाराने पुढाकार घेऊन पप्पू कागदे यांना उमेदवारीसाठी तयार केले होते. परंतु ऐनवेळी त्यांना उमेदवारी नाकारण्यात आली. त्यामुळे विश्वासघात झाल्याने संतप्त झालेल्या पप्पू कागदे यांनी आंबेडकरी चळवळीतील सर्व प्रमुख संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत भरगच्च पत्रकार परिषद घेऊन ''शिवछत्र'' परिवारावर तोफ डागली. ◀◀ पान ३ वर

## कंत्राटी कर्मचाऱ्याचे उद्धट वर्तन; सामाजिक कार्यकर्त्याने दिला चोप

गेवराई । प्रतिनिधी

अधिकारी आणि कर्मचारी यांनी लोकांची कामे वेळेत आणि प्रामाणिकपणे केल्यास सामान्य जनता त्या अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांना मानसन्मान देऊन डोक्यावर घेतात. मात्र मस्तवालपणा केल्यास जाग्यावर आणतात. गेवराई पंचायत समितीच्या कार्यालयात नारेगा विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्याला एका नामांकित सामाजिक कार्यकर्त्याने उद्धट बोलल्यामुळे धडा शिकविला. झाल्या प्रकाराची मोठी चर्चा होत आहे. या प्रकरणी चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

या संदर्भात माहिती अशी की, अनेक तक्रारी असलेल्या जोगदंड यांच्याकडे मादळमोही आणि परिसरातील कामासाठी एक सामाजिक कार्यकर्ता कामासाठी गेले. काम करून देण्यासंदर्भात बोलणे सुरू होते. यावेळी सदर कर्मचारी म्हणाला, माजी मंत्री हे माझे नातेवाईक आहेत. माझे काहीही होत नाही. कंत्राटी कर्मचारी जोगदंडचे हे बोलणे त्याच्या अंगलट आले. कार्यकर्त्याचा राग अनावर झाला. त्यावेळी वादावादी झाली. बाजूला असलेल्या एका कार्यकर्त्याने कर्मचाऱ्यांच्या श्रीमुखात भडकावली. त्याचे चुकल्यामुळे तक्रार तर सोडा, त्याने या प्रकरणी वाच्चताही केली नाही. सदर कंत्राटी कर्मचाऱ्याच्या अनेक गंभीर तक्रारी आहेत. अर्थपूर्ण व्यवहार शिवाय कामे न करणे, वेळेवर कामे न करणे, गायब राहणे, आलेला नागरिकांना उलट सुलट बोलणे. या प्रकरणी गटविकास अधिकारी संबंधित कंत्राटी कर्मचाऱ्यावर काय कारवाई करतात याकडे लक्ष लागले आहे.

## शेकाप नेते भाई बाळासाहेब घुमरे यांना मातृशोक श्रीमती मोहनमाला घुमरे यांच्यावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार

बीड । प्रतिनिधी

शेतकरी कामगार पक्षाचे जिल्हाचिटणीस तथा पुरोगामी विचाराचे ज्येष्ठ नेते भाई बाळासाहेब घुमरे यांच्या मातोश्री श्रीमती मोहनमाला चंद्रकांतराव घुमरे



यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ९३ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात सहा मुले, एक मुलगी सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात त्यांच्या राहत्या गावी पिंपळादेवी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता.

बीड तालुक्यातील पिंपळादेवी येथील रहिवासी असलेले शेकापचे नेते भाई बाळासाहेब धुमरे यांच्या मातोश्री मोहनमाला चंद्रकांत घुमरे या गेल्या काही दिवसापासून आजारी होत्या. त्यांच्यावर ◀◀ पान ३ वर

## तुटपुंजे अनुदान आले पण बँकेने होल्ड मारले! राष्ट्रीयकृत बँका शासनाचे आदेश पाळत नाहीत ?

**केज । प्रतिनिधी**

सप्टेंबर २०२५ महिन्यातील अतिवृष्टी पावसामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई म्हणून राज्य शासनाने तुटपुंजे अनुदान मंजूर केले असून सदरचे अनुदान शेतकऱ्यांच्या बँक खात्यात महाडीबीटी द्वारे वर्ग करण्यात आले आहे.मात्र केज तालुक्यातील सर्वच राष्ट्रीयकृत बँकांनी शेतकऱ्यांच्या थकीत पीक कर्जापोटी बचत खात्यांना होल्ड लावले आहे शासन आदेशानुसार अनुदान ,पीक विमा, व इतर शासनाच्या योजनेसाठी येणाऱ्या आर्थिक मदतीवर होल्ड लावता येणार नसल्याचे परिपत्रक काढले आहे .तरीसुद्धा महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा होळ,आयडीबीआय बँक,शाखा केज ,

बनसारोळा भारतीय स्टेट बँक ,शाखा केज धनेगाव, केज,बँक ऑफ महाराष्ट्र ,केज ,लोखंडी सावरगाव,येळंबघाट बँक ऑफ इंडिया, शाखा केज ,बँक ऑफ बडोदा शाखा ,केज आदी.. राष्ट्रीयकृत बँकांनी शेतकऱ्यांचे थकीत पीक कर्ज असलेल्या कर्ज खात्यात अनुदान वर्ग करून घेतल्याने बचत खात्यांना होल्ड लावले आहे. बँक खात्याला होल्ड असल्यामुळे पैसे काढता येत नाहीत त्यामुळे शेतकरी संतापले असून खरीप हंगामातील सर्व अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना रब्बी हंगामातील पिकांच्या पेरणीसाठी पैसे नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत तसेच रब्बी हंगामातील पिकांसाठी अनुदान सुद्धा बँक खाते होल्ड असल्यामुळे काढता येणार नसून सर्वच बँकाच्या आडमुठ्या धोरणामुळे शेतकरी नाराज आहेत तसेच अद्यापही ८०% बाधित शेतकऱ्यांना अनुदान मिळाले नसल्याने अनुदान वितरण,व बँक खाते होल्ड काढण्या संदर्भात आढावा घेण्यासाठी ,शेतकऱ्यांना बँक खात्यात अनुदानाचे पैसे उपलब्ध करून देण्याच्या प्रमुख मागणीसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष कुलदीप करपे यांच्या मागणीवरून केज तहसीलदार ◀◀ पान ३ वर

## बीड न.प.अध्यक्ष पदासाठी अनुसुचित जातीच्या जागेवर चुकीची उमेदवारी

### २४ नोव्हेंबर रोजी आंबेडकरी समाज बांधवांची निर्णायक बैठक

बीड । प्रतिनिधी

बीड न.प. निवडणुकीत अनुसूचित जातीच्या महिलासाठी आरक्षित झालेल्या नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी युवा रिपाइं प्रदेशध्यक्ष पप्पू कागदे यांना राष्ट्रवादी काँग्रेस व आरपीआय युतीमधून अजित पवार यांच्या गटाकडून जाहीर करण्यात आलेली उमेदवारी नाकारून ऐनवेळी आयात करण्यात आलेल्या व समाजाशी कसलीही बांधिलकी नसणाऱ्या उमेदवारास घडी या चिन्हावर उमेदवारी देऊन मागासवर्गीयांना आरक्षणाच्या संधीपासून डावलणाऱ्या अजित पवार गटाच्या उमेदवारास धडा शिकवण्यासाठी सोमवार दि. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ठीक १० वाजता हॉटेल नीलकमल येथे बीड शहरातील आंबेडकरी समाज बांधवांची निर्णायक बैठक आयोजित करण्यात आली आहे.

अजित पवार यांच्या गटाकडून ऐनवेळी पप्पू कागदे यांना उमेदवारी डावलून आयात केलेल्या उमेदवारास उमेदवारी देऊन आरक्षणाच्या संधीपासून मागासवर्गीयांना डावलण्याचे काम करण्यात आले. त्यामुळे बीड जिल्ह्यासह शहरातील आंबेडकरी समाज बांधवांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीला धडा शिकविण्यासाठी व ऐनवेळी आयात केलेल्या उमेदवारास ◀◀ पान ३ वर

## बीड नगर परिषदेची एकहाती सत्ता द्या विकास करून दाखवतो -आ. पंडित

**बीड । प्रतिनिधी**


महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार आपल्या बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. अजितदादांनी जसा बारामतीचा विकास केला तसा विकास आपल्या बीड शहराचा करायचा आहे. बीड शहराचे आमदार विरोधी पक्षाचे असले तरी ना.अजितदादांनी पक्षभेद न करता कोट्यावधी रुपयांचा ◀◀ पान ३ वर



## चार हजार रुपये प्रति टन उसाला भाव मिळावा यासाठी सर्व शेतकऱ्यांनी आंदोलनात सहभागी व्हावे -कॉ. सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

ऊसदर प्रश्नी जिल्ह्यातील सर्व शेतकरी संघटना एक होत आक्रमक पवित्रा घेत आहेत. जिल्ह्यातील माजलगाव या ठिकाणी दि.२४ नोव्हेंबर रोजी ऊस दरासाठी होणाऱ्या अभूतपूर्व चक्काजाम आंदोलनात सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे व ऊसतोडी बंद ठेवून ऊसतोड व वाहतूक बांधवांनी सहकार्य करण्याचे व संभाव्य नुकसान टाळण्याचे आवाहन ऊस उत्पादक शेतकऱ्याच्या वतीने व सर्व शेतकरी संघटनेचे वतीने करण्यात आले आहे. दि.२३ रोजी शेतकऱ्यांनी आपापल्या गावात टायर जाळून आपण सहभागी असल्याचा व यंत्रणांनी दखल



घेण्याचा सुचक इशारा द्यावा.

गळाप हंगाम २०२५-२६ साठी बीड जिल्ह्यातील कोणत्याही कारखान्याने केंद्र शासनाच्या घोषित एफआरपीप्रमाणे ऊसदर किती देणार? याबाबत कोणतेही भाष्य किंवा प्रसिद्धी पत्रक जाहीर केलेले नाही. यामुळे ऊसाचे दर आणि त्या दरांची घोषणा याबाबत जिल्हाभरात ऊस उत्पादक शेतकरी आक्रमक झाला तो रस्त्यावर उतरला आहे. या अनुषंगाने ऊस उत्पादक शेतकरी प्रतिनिधी नी जिल्हाभरातील जवळपास सर्वच ऊस कारखान्यांची भेट घेऊन शेतकऱ्यांना एफ.आर.पी. प्रमाणे एक रक्कमी भाव मिळावा या गाळप हंगामासाठी किती दर देणार? हे विचारण्यासाठी शिष्टमंडळ भेटले. मात्र यातून अपेक्षित गोष्टी घडून आल्या नाहीत. म्हणून हा प्रश्न आणखी चिगळला आहे. या अनुषंगाने दि. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी माजलगाव येथील वसंतराव नाईक चौक परभणी नाका या ठिकाणी जोपर्यंत प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत बेमुदत चक्काजाम आंदोलन करण्यात येणार आहे. ऊस कारखानदाराशी चर्चाकरून प्रश्न मार्गी लावण्याचा शेतकऱ्यांनी प्रयत्न केला होता; मात्र त्याला कारखानदारांनी प्रतिसाद न देऊन ती संधी गमावली. आता चर्चा चौकात होईल त्याच्यासाठी शेतकऱ्यांनी

मोठ्या संख्येने आंदोलनात दीर्घकाळ संघर्ष करण्याच्या तयारीने यावे व सर्व ऊस कारखानदार व साखर सहसंचालक संभाजीनगर यांना चर्चेसाठी येथेच येणे भाग पडावे आता चर्चा टेबलावर नाही ऊस दराची चर्चा होणार भर चौकात हा पवित्र घेतला आहे,त्यामुळे तालुक्यातील व मतदार संघातील सर्व शेतकऱ्यांनी या आंदोलनात सहभागी व्हावे असे आवाहन अखिल भारतीय किसान सभा माजलगाव व ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे.

## काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्याकडून दळवी कुटुंबाचे सांत्वन



बीड । प्रतिनिधी

कांग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आ.हर्षवर्धन सपकाळ यांनी दळवी कुटुंबियाची त्यांच्या राजीव गांधी चौक,बीड येथील निवासस्थानी सांत्वन पर भेट घेतली, कै.आशोक आप्पा दळवी यांच्या आकस्मिक निधनामुळे जो दुःखाचा डोंगर कुटुंबियावर कोसळला आहे त्या दुःखात आम्ही सहभागी आहोतअसे सांगत त्यांनी अशोक आप्पा दळवी यांच्या स्मृती जागृत करण्यासाठी त्यांच्या विविध सामाजिक शैक्षणिक कार्यात जो सहभाग घेतला आहे तो यापुढे चालू ठेवणे अतिशय महत्त्वाचा आहे असे सांगून दळवी परिवारातील सर्व सदस्यांची आस्थेवाईक पणे विचारपूस केली.काँग्रेस पक्ष्याचे राष्ट्रीय सचिव व पंजाब राज्याचे प्रभारी रवींद्र दळवी यांचे सह जेष्ठ बंधू एड. दिलिप दळवी , राजेंद्र दळवी तसेच आप्पाचे दोन्ही मूलं दिपक ,दिग्विजय,मुली आरती,भारती व सुनबाई कल्याणी ताई यांना धीर दिला.या वेळी माजी खासदार तुकाराम रेंगे पाटील,प्रदेश उपाध्यक्ष राजेंद्र राख,राहुल सोनवणे कांग्रेस जिल्हा अध्यक्ष ,शेगाव देवस्थान चे रामविजय बुरंगले, दादासाहेब मुंढे ,कैलास रकटे पाटील उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे विद्यापीठात प्राध्यापकांचे आंदोलन सहाव्या दिवशीही सुरूच

**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील प्राध्यापकांच्या विविध प्रलंबित प्रश्नांसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठीय व महाविद्यालयीन अध्यापक संघटना अर्थात स्पुक्टोने सुरू केलेल्या बेमुदत धरणे आंदोलनावर सहा दिवसांनंतरही तोडगा निघाला नाही, त्यामुळे प्राध्यापकांचे आंदोलन सुरूच आहे.

विद्यापीठ प्रशासनाबरोबर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची एक बैठक झाली. परंतु ही बैठक निष्फळ ठरली. परिणामी स्पुक्टो संघटनेने आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने येत्या सोमवारी २५ नोव्हेंबर रोजी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्याबरोबर चर्चा करण्यासाठी संघटनेच्या प्रतिनिधींना बोलावले आहे.



विद्यापीठातील विविध विभागांमध्ये अनेक नवीन विषय सुरू करण्यात आले आहेत. त्यासाठी विद्यापीठाने विद्यापीठ फंडातून नियमित वेतनश्रेणीवर प्राध्यापकांच्या नेमणुका केल्या आहेत. या प्राध्यापकांना सुरुवातीला पाच वर्षांचा कार्यकाळ देण्यात आला. त्यांचा कार्यकाळ पूर्ण झाल्यानंतर वीस वर्षे अथवा सेवानिवृत्तीपर्यंत सेवा सातत्य देण्याबाबत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने निर्णय घेतला. परंतु या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास विद्यापीठ प्रशासनाकडून विविध अडथळे निर्माण केले जात आहेत.

यामुळे प्राध्यापकांमध्ये असंतोष आहे. तसेच नियुक्तीपासून प्राध्यापकांना लागू असलेला अंशदायी भविष्य निर्वाह निधीसंदर्भात विद्यापीठाने नुकतेच एक परिपत्रक काढून तुटपुंजी रक्कम भविष्य निवाह निधी म्हणून जमा करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाला सुध्दा संघटनेने विरोध दर्शविला आहे. त्यामुळे विद्यापीठ प्रशासन या दोन प्रमुख मागण्यांवर ठोस निर्णय घेत नाही तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवले जाणार आहे.

गेल्या सहा दिवसांत आंदोलनस्थळी विविध संघटनांनी भेट देऊन आंदोलनाला पूर्ण पाठिंबा दिला. त्याचप्रमाणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनीसुध्दा आंदोलक प्राध्यापकांशी संवाद साधून यातून मार्ग काढण्यासाठी सकारात्मक असल्याचे सांगितले. परंतु विद्यापीठाकडे प्राध्यापकांची संख्या कमी असताना, आहे त्या प्राध्यापकांना एक ते तीन महिन्याची कंत्राटी नियुक्ती दिली जात आहे, ही बाब अन्यायकारक असल्याने आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्णय स्पुक्टो संघटनेने घेतला आहे. या आंदोलनावर येत्या सोमवारी तरी तोडगा निघावा, अशी मागणी संबंधित प्राध्यापकांनी केली आहे.

# पुणे पोलिसांची मोठी कामगिरी! गहाळ झालेले १७१ मोबाईल शोधून नागरिकांना परत

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे पोलिसांच्या परिमंडल पाचच्या हद्दीतून गहाळ झालेले १७१ मोबाईल तक्रारदारांना नुकतेच परत करण्यात आल्याने त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलले. शहराच्या गर्दीच्या ठिकाणांहून मोबाईल चोरीला जाणे तसेच गहाळ होण्याच्या घटना वाढल्या आहेत. पुणे पोलिसांच्या परिमंडल पाचच्या हद्दीतील नऊ पोलिस ठाणी आहेत. या पोलिस ठाण्यांच्या हद्दीतून नागरिकांचे मोबाईल चोरीला गेले होते तसेच काही जणांचे मोबाईल गहाळ झाले होते. याबाबत पुणे पोलिसांच्या 'लॉस्ट अँड फाउंड' पोर्टलवर तक्रारी करण्यात आल्या होत्या. पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला.




तांत्रिक तपासात हे मोबाऊल संच दुसरे सीम कार्ड घालून वापरत असल्याचे उघडकीस आले. पोलिसांनी मोबाऊल संच वापरणाऱ्यांशी संपर्क साधला आणि हे संच परत करण्याच्या सूचना दिल्या. मोबाऊल परत न दिल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते. चोरीचे मोबाऊल विकत घेऊन वापरणे हा गुन्हा असल्याचे पोलिसांनी त्यांना सांगितले. त्यानंतर पोलिसांकडे १७१ मोबाईल जमा करण्यात आले. मोबाईल तक्रारदारांना परत करण्यासाठी हडपसर भागातील एका मंगल कार्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

परिमंडल पाचचे पोलिस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्या हस्ते मोबाईल तक्रारदारांना परत करण्यात आले. या वेळी पोलिस उपायुक्त डॉ. शिंदे यांनी मोबाईल शोधण्यासाठी वापरलेल्या तांत्रिक तपासाची माहिती तक्रारदारांना दिली. मोबाऊल वापरणे हे अविभाज्य भाग आहे. एखाद्या व्यकीचा मोबाईल संच हरविल्यानंतर तो अस्वस्थ असतो. मोबाईलमधील माहिती, छायाचित्रांशी त्याचे भावनिक नाते असते. नागरिकांच्या सुरक्षेसाठी आणि मदतीसाठी पोलिस सदैव तत्पर असतात, असे डॉ. शिंदे यांनी नमूद केले. हडपसर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संजय मोगले यांनी प्रास्ताविक केले. उपनिरीक्षक शंभूराज जाधव यांनी सूत्रसंचालन केले. अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त अनुराधा उदमले, नम्रता देसाई, पोलिस निरीक्षक संजय मोगले, नीलेश जगदाळे, उपनिरीक्षक हसन मुलाणी, सत्यवान गेंड, अल्ताफ शेख, पोलिस कर्मचारी संदीप राठोड, समीर पांडुळे, बापू लोणकर, माधुरी डोके, सोनाली कुंभार, विक्रम भोर यांनी ही कामगिरी केली.

# तळेगावमध्ये भाजप-अजित पवार राष्ट्रवादीचे कार्यकर्ते भिडले

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

तळेगाव दाभाडे नगरपरिषद निवडणुकीत अर्ज मागे घेण्याच्या अखेरच्या दिवशी वातावरण चांगलंच तापलं होत. नगरपालिकेच्या इमारतीत राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये (इगझ तड छउझ) धक्का-बुक्की झाल्याने गोंधळ उडाला होता. तळेगांव पोलीसांनी मध्यस्थी केल्याने वातावरण निवळले, शहरातील दोन ते तीन ठिकाणी तणावपूर्ण परिस्थिती निर्माण झाली होती. राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपच्या कार्यकर्त्यां मध्ये धक्काबुक्की झाल्याने महायुती मधील हा अंतर्गत वाद चव्हाट्यावर आला.



तळेगाव दाभाडे नगरपरिषदमध्ये भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांची युती आहे. युतीमधून ही निवडणूक लढवली जात आहे. नेत्यांनी युती केली असली तरी कार्यकर्त्यांमध्ये मात्र धुसफूस दिसून येत आहे. तळेगांव मध्ये १९ नगरसेवक बिनविरोध झाले असून, राष्ट्रवादी १० तर भाजपचे ९ उमेदवार असे एकूण १९ बिनविरोध झाले आहेत.अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी निर्माण झालेल्या या गोंधळामुळे कार्यकर्त्यांमध्ये असलेल्या नाराजीत आणखी भर पडली आहे. महायुतीत असूनही उमेदवारी वाटप, प्रभाग रचना आणि स्थानिक पातळीवरील गटबाजी यामुळे दोन्ही पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते एकमेकांविरोधात उभे ठाकल्याचे स्पष्टपणे दिसत आहे. घडलेली धक्का-बुक्की ही केवळ एक किरकोळ घटना नसून, निवडणुकीच्या तणावपूर्ण वातावरणात युतीतील विसंवाद वाढल्याचे द्योतक मानले जात आहे. दरम्यान, तळेगावमध्ये १९ नगरसेवक बिनविरोध निवडून येण्याची स्थिती निर्माण झाली असली तरी उर्वरित जागांवर दोन्ही पक्षांतील तणाव कायम असल्याचे चित्र दिसून येत आहे. शहरातील काही भागांत कार्यकर्त्यांनी एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप केल्याची माहिती मिळते. पोलिसांनी तत्परतेने हस्तक्षेप केल्याने परिस्थिती नियंत्रणात आली, मात्र निवडणुकीच्या पुढील टप्प्यात महायुतीचा हा अंतर्गत संघर्ष किती वाढतो किंवा निवळतो, याकडे स्थानिकांच्या नजरा लागल्या आहेत.

# सराफी पेढीत खरेदीच्या बहाण्याने महिलांकडून दागिन्यांची चोरी

**पुणे । प्रतिनिधी**

खरेदीच्या बहाण्याने सराफी पेढीत शिरलेल्या महिलांनी दागिने चोरून नेल्याची घटना बंडगार्डन रस्ता, तसेच कोंढवा भागात घडल्या. याप्रकरणी कोरेगाव पार्क आणि कोंढवा पोलीस ठाण्यात दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहे. सराफी पेढीत चोरी करणाऱ्या महिलांनी बुरखा परिधान केल्याचे चित्रीकरणात आढळून आले.

बंडगार्डन स्त्यावरील एका प्रसिद्ध सराफी पेढीत शिरलेल्या महिलांनी खरेदीच्या बहाण्याने पावणेपाच लाख रुपयांचे सोन्याचे कडे चोरून नेल्याची घटना उघडकीस आले. याप्रकरणी सराफी पेढीतील रोखपालाने कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बंडगार्डन रस्त्यावर एका प्रसिद्ध सराफी पेढीत १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी पावणेसहाच्या सुमारास बुरखा परिधान केलेल्या दोन महिला खरेदीच्या बहाण्याने शिरल्या. महिलांनी सराफी पेढीतील कर्मचाऱ्यांना दागिने दाखविण्यास सांगितले. कर्मचाऱ्यांना बोलण्यात गुंतविले. दागिने खरेदीचा बहाणा करून महिलांनी ४ लाख ७४ हजार रुपयांचे सोन्याचे कडे चोरून नेले. कडे चोरीला गेल्याचा प्रकार उघडकीस आल्यानंतर नुक्तीच पोलिसांकडे तक्रार देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी भेट दिली असून, सराफी पेढीतील चित्रीकरण तपासण्यात आले आहे. पसार झालेल्या महिलांचा शोध घेण्यात येत आहे. पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत चव्हाण तपास करत आहेत.

# पुणे पोलिसांची मोठी कारवाई; मध्य प्रदेशातील शस्त्र बनविणाऱ्या ५० भट्ट्यांवर बुलडोझर

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहर पोलिसांनी संघटित गुन्हेगारीविरोधात मोठी मोहीम राबवत आंतरराज्य पातळीवरील अवैध शस्त्रउद्योगाचा पर्दाफाश केला आहे. शहरातील विविध भागातून २१ अवैध पिस्तुले आणि दारूगोळा जप्त करण्यात आला असून, पुढील तपासात मिळालेल्या माहितीच्या आधारे मध्यप्रदेशात छापा टाकून ३६ संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे.मागील तीन आठवड्यांपासून विमानतळ, काळेपडळ, गुन्हे शखा आणि एईसी पथकांनी केलेल्या धडक कारवाईत एकूण २१ शस्त्रे जप्त झाली. या प्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.





या तपासदरम्यान मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून पोलीस उपायुक्त सोमय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मध्यप्रदेशातील उमारती गावात पहाटे छापा टाकण्यात आला. येथे अवैध शस्त्रनिर्मितीचा मोठा अड्डा पोलिसांना सापडला. या कारवाईत ३६ संशयितांना जेरबंद करण्यात आले तर मोठ्या प्रमाणात शस्त्रे व सुटे भाग जप्त केले गेले. शस्त्र बनविणाऱ्या ५० भट्ट्यांचा नाश करण्यात आला तर शस्त्रांवर नावे उमटविण्याचे साहित्य जप्त करण्यात आला. या धाडीसाठी शीघ्र कृती दल, गॅस गन सेक्शन, वायरलेस आणि सीसीटीव्ही टीम यांसह मोठा फौजफाटा सज्ज ठेवण्यात आला होता. मोबाइल सर्व्हिलन्स व्हॅन, बुलेटप्रूफ जॅकेट्स, बॉडी वॉर्न कॅमेरे यांचाही वापर करण्यात आला.

तपासातील प्राथमिक निष्कर्षानुसार, जप्त केलेली अवैध शस्त्रे णारीरींळ डहळङ्मश्रसरी -ीाी (णड-) या नावाने तयार करून महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान आणि छत्तीसगड या राज्यांत पुरवली जात असल्याचा संशय आहे. ताब्यात घेतलेल्या संशयितांच्या भूमिकेनुसार त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाणार असून अवैध शस्त्र पुरवठा साखळीचा पूर्ण उलगडा करण्यासाठी तपास वेगाने चालू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# ट्रकच्या धडकेत तरुणीचा मृत्यू; आठवड्याभरात दुसरी घटना

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

शहरालगतच्या हिंजवडी मारुंजी परिसरात कसारसाई धरणावरून पर्यटन करून घरी परतत असताना दुचाकीला रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) ट्रकने धडक दिल्याने झालेल्या अपघातात (क्ळपक्षशुरवळ -ललळवशपीं छ्शुि) १९ वर्षीय तरुणीचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. रीदा इमरान खान असे मृत्यू (क्ळपक्षशुरवळ -ललळवशपीं छ्शुि) झालेल्या तरुणीचे नाव आहे. मिक्सर ट्रकच्या धडकेने अपघात होण्याची आठवड्यातील ही दुसरी घटना आहे.





पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मयत तरुणी रीदा आणि तिचा मित्र विवेक हे दोघे पुण्याहून कासारसाई परिसरामध्ये पर्यटनासाठी आले होते. पर्यटनाचा आनंद घेतल्यानंतर पुण्याच्या (क्ळपक्षशुरवळ -ललळवशपीं छ्शुि) दिशेने परतत असताना मारुंजी परिसरात आले असता मागून त्यांना आरएमसी ट्रकने धडक दिली, या धडकेत दुचाकीवरील रिदा खाली पडली व तिचा या घटनेत दुर्दैवी अंत झाला आहे. या घटनेनंतर तात्काळ हिंजवडी पोलिसांनी आरएमसी ट्रकचा चालक अजमल अख्तर अन्सारी याला अटक केली असून त्याच्यावरती हिंजवडी (क्ळपक्षशुरवळ -ललळवशपीं छ्शुि) पोलीस ठाण्यात गुन्हा देखील दाखल करण्यात आला आहे. वारंवार आरएमसी ट्रकमुळे होणाऱ्या अपघातांमुळे पोलीस प्रशासन आता काय कठोर भूमिका याबाबत घेणार हे पाहणे देखील आता महत्त्वाचा असणार आहे. हिंजवडी आयटी परिसरात अवजड वाहनांच्या अपघातांचे सत्र सुरूच आहे. सोमवारी दि.१७ दुपारी डम्परच्या धडकेत चाकाखाली चिरडल्याने हिंजवडीतील एका २० वर्षीय युवतीचा दुर्दैवी मृत्यू (क्ळपक्षशुरवळ -ललळवशपीं छ्शुि)झाला. तन्वी सिद्धेश्वर साखरे (वय २०, रा. फ्लॅट नं. ०४, मुक्तानंद हाइट्स, गावठाण रस्ता, हिंजवडी) असे अपघातात मृत्यू झालेल्या तरुणीचे नाव आहे. डंपरचालक अजय अंकुश ढाकणे (वय २०, रा. जांबे) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

मृत तरूणी तन्वी ही आपल्या वडिलांसोबत दुचाकीवरून (एमएच- १४, केव्ही- ३८८३) जांबे येथील आर-१६, कोलते पाटील, न्यू सर्कल परिसरातून मारुंजीच्या दिशेला जात होती. यावेळी पाठीमागून आलेल्या डंपरच्या धडकेत (एमएच- १४, एचयू- ९८५५) चाकाखाली येऊन तन्वीचा मृत्यू झाला. अपघातात तिचे वडील जखमी झाले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, तन्वी फॅशन डिझायनरचा कोर्स करत होती. तिला एक लहान बहीण असून, वडिलांचा टूर्स अँड ट्रॅव्हल्सचा व्यवसाय आहे.

# कळंबमध्ये पुन्हा थरार; १५ दिवसांत दुसऱ्यांदा बिबट्या सीसीटीव्हीत कैद

**मंचर । प्रतिनिधी**

कळंब (ता.आंबेगाव) येथील शिरामळा वस्तीवरील शेतकरी वरूण पिंगळे यांच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये पंधरा दिवसानंतर पुन्हा दुसऱ्यांदा शुक्रवार, दि.२१ रोजी पहाटे बिबट्या घरासमोर आल्याची घटना सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.घरासमोरील कुत्र्यावर बिबट्याने हल्ला केला.परंतु सुदैवाने कुत्र्याने तेथून पळ काढल्याने कुत्रा वाचला. शिरामळा येथील वस्तीवर सध्या बिबट्याने धुमाकूळ घातला असून वस्तीवरील कुत्री,मांजरी यांचा फडशा पाडला आहे.



शेतात काम करणे व रात्री अप रात्री घरी पायी व दुचाकीवर जाणे रस्त्याने भीतीदायक झाले आहे. तरी शिरामळा वस्तीवर बिबट्याला जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावावा.अशी मागणी माजी उपसरपंच डॉ.सचिन भालेराव यांनी केली आहे.तसेच बुधवार दि.१९ रोजी रात्री साडेनऊच्या दरम्यान कळंब गावठाणातील पशुवैद्यकीय दवाखान्याजवळ रहिवासी महिला शेकोटी पेटवून शेकत असताना कुत्रे भुंकण्याचा आवाज आला. मागे वळून पाहिले असता बिबट्या जवळच दोनशे फुटाच्या अंतरावर असल्याचे दिसून आले. महिलांनी आरडाओरडा करताच तेथून त्याने पळ काढला. केवळ नशीब बलवत्तर म्हणून सुदैवाने मोठी घटना होण्याची टळली. तेथे असणाऱ्या कुत्र्यांच्या भुंकण्यामुळे बिबट्या तेथूनच मागे असणाऱ्या शेतात पळून गेला, असे उद्योजक संदीप उर्फ पप्पू भालेराव यांनी सांगितले. भय इथले संपत नाही

गावठाणातील भर नागरी वस्तीत बिबट्या भक्ष शोधण्यासाठी मोकाट कुत्र्यांच्या शोधात येऊ लागल्यामुळे नागरिकांना भरवस्तीत राहणे सुद्धा मुश्किल झाले आहे. गावठाणात बिबट्याच्या भीतीने मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला असून त्यांना शोधण्यासाठी बिबटे गावातही येऊ लागल्याचे दिसू लागले आहे. त्यामुळे या भागात बिबट्याचा कधी हल्ला होऊ होईल, सांगता येत नाही. थोडक्यात भय इथले संपत नाही, अशी परिस्थिती झाली आहे. तरी शासनाने या बिबट्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करणे गरजेचे झाले आहे.अशी मागणी सर्वच ग्रामीण भागात जोर धरू लागली आहे.

# निवडणुकीआधीच गुलाल! राजगुरुनगरचे 'हे' तीन शिलेदार ठरले बिनविरोध

**राजगुरुनगर । प्रतिनिधी**

राजगुरुनगर नगरपरिषद निवडणुकीत उमेदवारी अर्ज माघारी घेण्याचा आज (दि. २१) अंतिम दिवस होता. माघारीनंतर नगराध्यक्षपदासाठी ५ उमेदवार, तर नगरसेवकांच्या १८ जागांसाठी ५६ उमेदवार रिंगणात आहेत. दरम्यान, तीन प्रभागांत तीन उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत.




प्रभाग क्र.१ (अ) मधून किशोर संभाजी थिगळे (अपक्ष), प्रभाग क्र.३ (ब) मधून अनिरुद्ध (दिनेश) दीपक सांडभोर (राष्ट्रवादी काँग्रेस - अजित पवार गट) तर प्रभाग क्र.१० (ब) मधून सुप्रिया राहुल पिंगळे (शिवसेना) हे तिन्ही उमेदवार बिनविरोध विजयी झाले. प्रभाग क्रमांक तीनमधील शिवसेना उमेदवाराने नागरिकांच्या एकमतानंतर माघार घेतली.

नगराध्यक्षपदासाठी पक्षनिहाय उमेदवार किरण चंद्रकांत आहेर - राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), गणेशकुमार लक्ष्मण इंगवले - अपक्ष, मंगेश वसंत गुंडाळ - शिवसेना, बापू किसन थिगळे - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट), शिवाजी नंदकुमार मांदळे - भाजपा

कोटी रुपयांच्या 'लिलाव'ची चर्चा

नगरसेवक पदासाठी प्रभाग क्र.१ मध्ये तब्बल एक कोटी रुपयांचा 'लिलाव' झाल्याची चर्चा स्थानिक स्तरावर रंगली आहे. सर्वसाधारण जागेसाठी बोली एक कोटी रुपयांच्या वर गेल्याची, तर महिला जागेसाठी सुमारे २२ लाखांपर्यंत पोचल्याची चर्चा नागरिकांत आहे. पुरुष जागा बिनविरोध झाल्यानंतरही महिला जागेसाठी कोणीही माघार घेतली नसल्याने तिघी अपक्ष उमेदवार रिंगणात राहिल्या. तथापि, याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा नसल्याचे तसेच अधिकार्यांकडून यास दुजोरा मिळालेला नसल्याचे समजते.

# वीर जलाशयातून पाणी जेजुरीत आणणारच : जयदीप बारभाई

**पुणे । प्रतिनिधी**

जेजुरी नगरपरिषदेच्या तत्कालीन सत्ताधाऱ्यांनी वीर जलाशयातून जेजुरीसाठीची पाणी योजना जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून तयार केलेली ३५ कोटींची पाणी योजनेची फाईल पुन्हा उघडण्याची आणि वीर धरणाचे पाणी जेजुरीत आणण्याचे आश्वासन जेजुरी पालिकेसाठी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार जयदीप बारभाई यांनी दिले.



या योजनेमुळे २०५० सालापर्यंत जेजुरीतील स्थानिकांना आणि देवदर्शनासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. सत्ता मिळाल्यावर पहिल्या १०० दिवसांत ही फाईल पुन्हा उघडणार,असल्याचे सांगितले. होऊ घातलेल्या २०२५ च्या नगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादीच्या काँग्रेसच्या नगराध्यक्षपदाचे आणि नगरसेवक उमेदवारांच्या प्रचाराचा देवसंस्थान प्रमुख संदीप जगताप यांच्या हस्ते नारळ फोडून करण्यात आला.

यावेळी जेजुरीकरांची लक्षणीय गर्दी, विशेषतः महिलां मोठ्याप्रमाणावर उपस्थित होत्या. यावेळी कार्यक्रमात कार्यकत्यांनी व मतदारांनी जयदीप बारभाई यांना पाठिंबा दर्शवला. प्रचाराच्या सुरुवातीलाच झालेल्या या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे निवडणुकीची रंगत वाढल्याचे चित्र जेजुरीनगरीत पाहावयास मिळत आहे.

# जुन्नरमध्ये ऐतिहासिक निकाल! ८० वर्षांच्या बापाची तक्रार आणि मुलाला थेट जेल; 'या' कायद्याने दिली वृद्धांना ताकद

**बेल्हे । प्रतिनिधी**

**आई-वडिलांचे पालन पोषण न क**रणार्या निमगाव सावा (ता. जुन्नर) येथील मुलाला न्यायालयाने दणका दिला असून ३ महिने करावास व ५००० रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.या प्रकरणी नारायणगाव पोलिसांत दाखल केलेल्या गुन्ह्यावरून दोन मुलांपैकी एकावर जुन्नर न्यायालयाने तीन महिने सश्रम कारावास व पाच हजार रुपये द्रव्य दंडाची शिक्षा सुनावली आहे, अशी माहिती नारायणगाव पोलीस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक प्रवीण सपांगे यांनी दिली.



लक्ष्मण विठ्ठल गाडगे (वय ४९, रा. निमगाव सावा) असे शिक्षा सुनावल्याचे नाव आहे. निमगाव सावा येथील विठ्ठल बाबूराव गाडगे (वय ८०) यांना लक्ष्मण व सुनील (वय ५३, दोघेही रा. निमगाव सावा) ही दोन मुले आहेत. विठ्ठल हे वयोवृद्ध पत्नीसह निमगाव सावा येथेच राहत आहेत. ते स्वतःचा चरितार्थ स्वतःच करत आहेत; मात्र त्यांची दोन्ही मुले त्यांचे घर व शेतजमीन या मालमत्तेचा उपभोग घेत आहेत. असे असतानादेखील दोन्ही मुले माझा व माझ्या पत्नीचा सांभाळ करत नाहीत, अशी तक्रार त्यांनी १३ मे २०२३ रोजी नारायणगाव पोलिस ठाण्यात दिली होती. या प्रकरणी नारायणगाव पोलिसांनी दोन्ही मुलांवर ज्येष्ठ नागरिकांचे पालनपोषण कल्याण कायदा २००७ चे कलम २४ प्रमाणे गुन्हा दाखल केला होता. पोलीस हवालदार एस. एम. कोकणे यांनी या गुन्ह्याचा तपास करून दोषारोपपत्र जुन्नर न्यायालयात दाखल केले होते. कोर्‌अ पैरवी म्हणून महिला कॉन्स्टेबल एल. ए. किर्वे यांनी काम पाहिले. या गुन्ह्यातील दोषारोपपत्र व गुन्ह्याच्या कागदपत्रांचे अवलोकन करून जुन्नर न्यायालयाचे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी अनंत बाजड यांनी आरोपी लक्ष्मण गाडगे याला शिक्षा सुनावली आहे.